मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३०८ ■ मंगळवार, २१ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514







## सय्यद अजगर अली पटेल महाराष्ट्रातील ज्येष्ठ कबड्डी कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित



**दैनिक युवक आधार**

**श्री क्षेत्र माहूरगड प्रतिनिधी सय्यद ईसा** : नुकताच 15 जुलै रोजी रत्नागिरी येथे क्रीडा महर्षी बुवा साळवी यांच्या जयंतीचे औचित्य साधून कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात आला, या अनुषंगाने कबड्डी या खेळातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला .

त्यामध्ये नांदेड कबड्डी असोसिएशनचे सचिव सय्यद अजगर अली पटेल यांचे देखील कार्य उल्लेखनीय आहे, त्यांनी सन 1990 पासून आज पर्यंत कबड्डी या खेळासाठी स्वतःला झोकून दिले त्यांनी अनेक स्पर्धेमध्ये पंच म्हणून नावलौकिक मिळवले.

अनेक नामांकित कबड्डी स्पर्धेमध्ये संघ व्यवस्थापक, संघ प्रशिक्षक, पंच म्हणून नावलौकिक मिळविले आहे त्यांच्या या कार्याची दखल म्हणून 15 जुलै रोजी रत्नागिरी येथे पार पडलेल्या कार्यक्रमध्ये माननीय उद्योगमंत्री श्री उदय सामंत यांच्या हस्ते ज्येष्ठ कबड्डी कार्यकर्ता म्हणून त्यांना पुरस्कार देण्यात आला .


या कार्यक्रमाला माननीय खासदार श्री गजानन कीर्तिकर, आमदार दिनकर पाटील ,आमदार भाई जगताप ,कबड्डीचे सचिव मोहन गायकवाड, कबड्डी असोसिएशनचे खजिनदार श्री मंगल पांडे हे उपस्थित होते .

विविध खेळांच्या संघटने कडुन ,खेळाडू कडून, मान्यवरा कडुन मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# सोनम वांगचुक यांनी अखेर २३ व्या दिवशी उपोषण सोडले !

## जे. पी. नड्डा यांच्यासोबत सकारात्मक चर्चेनंतर निर्णय

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि 'कॉकरोच जनता पार्टी' (CJP) च्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण मागे घेतले आहे. सरकारने चर्चेसाठी पुढाकार घेतल्यामुळेच हा निर्णय घेण्यात आल्याचे CJPच्या नेत्यांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून शिक्षण व्यवस्थेतील कथित त्रुटी, नीट परीक्षा प्रकरण आणि शिक्षण क्षेत्रातील उत्तरदायित्वाच्या मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाकडे देशभराचे लक्ष लागले होते. दरम्यान, रविवारी वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी भूमिका स्पष्ट करत सांगितले होते की, संसदेच्या पावसाळी अधिवेशनात शिक्षण क्षेत्रातील उत्तरदायित्वाचा मुद्दा उपस्थित करण्याचे राजकीय पक्षांनी आश्वासन दिल्यासच वांगचुक उपोषण मागे घेतील. तसेच 'चलो संसद' ही मोहीम पूर्णपणे शांततापूर्ण असावी, अशी वांगचुक यांची इच्छा असल्याचेही त्यांनी नमूद केले. सोमवारी केंद्र सरकारने CJPच्या प्रतिनिधींशी चर्चा सुरू केली.



पक्षाचे प्रवक्ते सौरव दास आणि नेते आशुतोष रांका यांनी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, या बैठकीसाठी केवळ दहा मिनिटांचा वेळ देण्यात आल्याबद्दल CJPने नाराजी व्यक्त केली. दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अवघ्या दहा मिनिटांची भेट मिळाल्याचे सांगत सौरव दास यांनी सरकारने मागण्यांवर गंभीरतेने विचार करण्याची अपेक्षा व्यक्त केली. बैठकीदरम्यान सादर केलेल्या निवेदनावर अंतर्गत चर्चा केली जाईल, असे आश्वासन जे. पी. नड्डा यांनी दिल्याचेही त्यांनी सांगितले. या बैठकीत CJPने सरकारसमोर अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. त्यामध्ये सोनम वांगचुक यांची तातडीने सुटका करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, तसेच नीट परीक्षेशी संबंधित घटनांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशा मागण्यांचा समावेश आहे. या मागण्यांवर केंद्र सरकार काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, आंदोलनात सहभागी असलेल्या इतर कार्यकर्त्यांनीही आपले उपोषण मागे घेतले आहे. याआधी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी उपोषण सोडले होते. तसेच ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन (AISA) च्या तीन सदस्यांनीही आंदोलन मागे घेतले आहे. अभिनेत्री आणि माजी खासदार शबाना आझमी, राष्ट्रीय जनता दलाचे (RJD) राज्यसभा खासदार मनोज झा आणि अभिनेते प्रकाश राज यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून उपोषणकर्त्यांना पेय देत त्यांचे उपोषण सोडण्यास मदत केली. सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये संवाद सुरू झाल्यामुळे पुढील काळात शिक्षण व्यवस्थेशी संबंधित प्रश्नांवर अधिक व्यापक चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच आंदोलनकर्त्यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत केंद्र सरकार कोणता निर्णय घेते, यावर या संपूर्ण आंदोलनाची पुढील दिशा अवलंबून असणार आहे.

**CJP च्या प्रमुख मागण्या कोणत्या?**

१. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा त्वरित राजीनामा द्यावा, त्यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही.

२. आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या पीडित कुटुंबांना सरकारकडून तातडीने आर्थिक मदत दिली जावी.

३. सोनम वांगचुक यांना रुग्णालयातून तात्काळ मुक्त करण्यात यावे, जेणेकरून ते व्हिडिओ संदेशाद्वारे आंदोलकांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचे आवाहन करू शकतील.

# मा. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जळका येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ९००+ रुग्णांची मोफत तपासणी, २० तज्ञ डॉक्टरांची सेवा आणि आयुष्मान कार्ड वाटप

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-जितेंद्र खोडे** : राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राळेगाव तालुक्यातील जळका येथे दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय आणि डॉ.कुणाल बाबाराव भोयर मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.






शिबिराचे उद्घाटन राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना. अशोकजी उईके,भाजपा यवतमाळ जिल्हाध्यक्ष श्री. प्रफुल्ल चव्हाण,भाजपा राळेगाव तालुका अध्यक्ष सौ. छायाताई पिपरे, राळेगाव तहसीलदार श्री.अमित भोईटे आणि गटविकासधिकारी श्री. केशव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत फीत कापून करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर डॉ. कुणाल भोयर मित्र परिवारातील पदाधिकारी, विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.२० तज्ञ डॉक्टरांकडून ९००+ रुग्णांची तपासणी करण्यात आली शिबिरात नेत्ररोग,अस्थिरोग,मेडिसीन, शल्यचिकित्सा,बालरोग,स्त्रीरोग, त्वचारोग,दंतरोग यासह विविध विभागातील २० हून अधिक तज्ञ डॉक्टरांनी सेवा दिली.परिसरातील गावांमधून आलेल्या ९०० पेक्षा जास्त रुग्णांची मोफत तपासणी आणि उपचार करण्यात आले. रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली तसेच आयुष्मान भारत कार्ड देखील मोफत काढून देण्यात आले.शिबिराला शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. शिबिराच्या ठिकाणी रुग्णांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती.डॉ.कुणाल भोयर यांचा मानवतावादी निर्णयया शिबिराच्या निमित्ताने डॉ. कुणाल भोयर यांनी एक मोठी घोषणा केली.आदित्य उईके हा डबल सिकल सेल आजाराने ग्रस्त आहे.त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहता डॉ. कुणाल भोयर यांनी आदित्यच्या उपचार,शिक्षण आणि पालन-पोषणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली असल्याचे जाहीर केले. या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ना.अशोक उईके म्हणाले,"डॉ. कुणाल भोयर हे समाजसेवेचे उत्तम उदाहरण आहेत.त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागाला दर्जेदार आरोग्यसेवा मिळत आहे."प्रफुल्ल चव्हाण यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू केलेला हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.तहसीलदार अमित भोईटे आणि गटविकास अधिकारी केशव पवार यांनी देखील या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.शिबिराचे यशस्वी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन रणधीर किनाके यांनी केले.

## सीकेटी महाविद्यालयात "भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" विषयावर व्याख्यानाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभागा तर्फे, आज (दि. २० जुलै) "भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. बी .एस. पाटील, यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. मा.अरविंद मोरे (सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी) बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल, यांनी अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना "भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या विषयावर मार्गदर्शन केले.

"भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या व्याख्यानामध्ये भारतातील बँकांचे राष्ट्रीयीकरण हे का? केव्हा? आणि कोणत्या कारणामुळे झाले. तसेच सध्या व्यापारी बँकांसमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय या वेगवेगळ्या मुद्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या व्याख्यानासाठी अर्थशास्त्र विभागाच्या एकूण ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

"भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या आयोजित व्याख्यानाच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस.के.पाटील,आय.क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी. डी.आघाव, यांचे मार्गदर्शन लाभले. या व्याख्यानाचे सूत्रसंचालन प्रा. एच. एस खरात, आणि व्याख्यानाचे आभार प्रदर्शन डॉ. के.बी.ढोरे यांनी केले, या व्याख्यानासाठी प्रा. निलिमा अरविंद मोरे यांची देखील उपस्थिती लाभली.









## पनवेल शहर पोलिसांची मोठी कारवाई : घरफोडी प्रकरणातील सराईत आरोपीसह चौघांना अटक; 7 गुन्ह्यांची उकल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या पारगाव शाखेतील सहाय्यक अभियंता अमित पाटोळे यांच्या कार्यक्षेत्रातील 34 ट्रान्सफॉर्मरपैकी 7 ट्रान्सफॉर्मरमधील साहित्य चोरी झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करताना पनवेल शहर पोलिसांनी सराईत आरोपीसह त्याच्या तीन साथीदारांना अटक करून एकूण 7 गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे.



या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने केला. घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. यावेळी पोलीस नाईक सम्राट डाकी यांना यास खबऱ्याकडून सदर आरोपींची माहिती मिळाली. त्यानुसार अमर मुस्ताक अहमद, शिवम अमरनाथ शर्मा, गणेश मनोज शाहू आणि आलोक अजय गौतम यांना सापळा रचून ताब्यात घेण्यात आले.

सदर कारवाईत पोउपनि दत्तात्रय देवकते, पोहेकॉ योगेश दिवेकर, पोना सम्राट डांकी, पोना अनिल चव्हाण, पोशि दत्ता जाधव, पोशि साईनाथ मोकल, पोशि विशाल दुधे आणि पोशि सचिन कोर यांनी सहभाग घेतला. अटक आरोपींकडे अधिक चौकशी सुरू असून, त्यांच्या विरोधात परिसरात आणखी गुन्हे दाखल आहेत का याचा तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# अवैध दारूविक्रीवर कडक कारवाई करणार– आदीत्य पवार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नवनियुक्त राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड आदित्य पवार यांनी आपल्या पदाचा नुकताच पदभार स्वीकारल्यावर रायगड जिल्ह्यात अवैध दारूविक्री व गावठी दारू विक्रेत्यांना कडक इशारा देत कुणाचीही गय केली जाणार नसल्याचे संकेत दिले आहेत

छत्रपती संभाजी नगर येथे शालेय व महाविद्यालय शिक्षण पुर्ण करून त्यांनी सॉप्टवेअर इंजीनियरींगचे शिक्षण घेऊन आपल्या जिवलग मित्रपरीवारांचा कल शासकीय सेवेकडे असल्याचे त्यांनी पारखल्याने आदीत्य पवार हे देखील शासकीय सेवेत आल्याचे समजते

हिंगोली येथे कार्यरत असताना आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एका मोठ्या कारवाईदरम्यान सुमारे 1.65 लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.23 ते 25 मे 2026

या कालावधीत जिल्ह्याभरात अवैध दारूविक्री व दारू वाहतुकीविरोधात एक विशेष मोहीम अधिक्षक आदित्य पवार यांनी राबविली होती विविध बीट अंतर्गत त्यांच्या अधिकारी व कर्मचारी पथकाने औढा तालुका परीसरात धाडसत्र राबवुन 21 आरोपींविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत 1949 चे कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले होते या कारवाईत गावठी दारू भट्टया अवैध दारू करीता वापरण्यात येणारी वाहनेही जप्त करण्यात आल्याने अवैध दारू विक्री करणारांचे धाबे दणाणले होते



रायगड जिल्ह्याबाबत त्यांनी पत्रकारांशी बोलताना आपली भुमिका स्वष्ट करताना सांगीतले की रायगड जिल्ह्यातील गावठी दारू भटट्या पुर्णता उध्वस्त केल्या जातील व संबधीतांवर कठोर कारवाई केली जाईल तसेच रायगड जिल्ह्यातील अवैध्य दारू विक्री अथवा दिव दमणची काही बार रेस्टॉरन्ट मध्ये जी छुपी विक्री केली जात असल्याची माहीती प्राप्त होत आहे त्यांवर कठोर पावले उचलण्याचे माझ्या अधिकारी वर्गाला मी सुचना दिल्या आहेत

प्रशासकीय कामाबद्दल पारदर्शकता बाळगुन माझ्या अखत्यारीतील कामचा व विविध तालुकानिहाय कार्यालयातील कामकाजाचा सातत्याने आढावा घेऊन व्यावसाईकांची कामे मार्गी लावुन चांगल्या पध्दतीने काम करण्याचा माझा मानस असेल असे नवनियुक्त राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांनी बोलताना सांगीतले

# डॉ. आदर्श पाटील यांच्या 'ऑर्थोपेडिक क्लिनिक'चे सानपाड्यात दिमाखात उद्‍घाटन; मान्यवरांची मांदियाळी

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई: प्रतिनिधी** : सानपाडा सेक्टर-१ येथे प्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. आदर्श पाटील यांच्या नूतन ऑर्थोपेडिक क्लिनिकचा भव्य उद्घाटन सोहळा राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांच्या हस्ते शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, पत्रकारिता आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांनी उपस्थित राहून डॉ. आदर्श पाटील यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटन सोहळ्याला राज्याचे वनमंत्री व पालकमंत्री गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, नगरसेविका माधुरी सुतार शैला पाटील, शुभांगी पाटील शशिकला पाटील,नगरसेवक सूरज पाटील, नगरसेविका शिल्पा ठाकूर, माजी मनपा विरोधी पक्षनेते नामदेव भगत,ठाणे जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष राहुल पिंगळे,सामाजिक कार्यकर्ते सुधीर दाणी, सुभाष हांडे देशमुख परशुराम ठाकूर, गणेश कमळे, मराठी अभिनेता अशोक पालवे,डॉ. रविन्द्र इंगळे,डॉ. उसनाळे, डॉ. भूषण जैन,डॉ, सांगळे,




डॉ श्रीमंत जगताप माजी जिल्हाधिकारी सुनील शेळके, माजी उपआयुक्त दत्तात्रय नागरे, चंद्रकांत तायडे विविध क्षेत्रातील समाजसेवक, डॉक्टर्स, वरिष्ठ अधिकारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक व रहिवाशांनीही या सोहळ्याला हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

'नावाप्रमाणेच क्लिनिक आदर्श ठरेल' – मान्यवरांचे प्रतिपादन

उद्घाटनप्रसंगी बोलताना पालघर जिल्हा पालकमंत्री ना.गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे आणि महापौर सुजाता पाटील यांनी डॉ. आदर्श पाटील यांच्या वैद्यकीय कौशल्याचे कौतुक केले.

"ज्येष्ठ पत्रकार दिनेश पाटील यांचे सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील कार्य नेहमीच लोकाभिमुख राहिले आहे. डॉ. आदर्श पाटील देखील त्यांचा हाच समाजसेवेचा वारसा पुढे चालवतील. नावाप्रमाणेच हे क्लिनिक एक 'आदर्श' म्हणून रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. हाडांच्या व सांध्यांच्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना या ठिकाणी उत्तम आणि खात्रीशीर उपचार मिळून नक्कीच आराम पडेल," अशा भावना मान्यवरांनी आपल्या शुभेच्छांमधून व्यक्त केल्या.

**आधुनिक उपचार आणि रुग्णसेवा हेच ध्येय – डॉ. आदर्श पाटील**

उपस्थितांचे आभार मानताना आणि आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. आदर्श पाटील म्हणाले,



"आजवर मी अनेक नामांकित आणि मोठ्या रुग्णालयांमध्ये ऑर्थोपेडिक सर्जन म्हणून कार्यरत होतो. तिथे काम करण्याचा मोठा अनुभव गाठीशी आहे. आता सानपाड्यात हे स्वतःचे स्वतंत्र युनिट (क्लिनिक) सुरू करताना मला आनंद होत आहे. मोठ्या कॉर्पोरेट हॉस्पिटल्समध्ये ज्या दर्जाच्या आरोग्य सेवा आणि आधुनिक उपचार मिळतात, अगदी तशाच प्रकारच्या अद्ययावत सेवा या क्लिनिकच्या माध्यमातून सर्वसामान्य रुग्णांना देण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील."

सानपाडा आणि परिसरातील नागरिकांसाठी हे ऑर्थोपेडिक क्लिनिक वरदान ठरणार असून, हाडांच्या व सांध्यांच्या सर्व विकारांवर आता या क्लिनिक माध्यमातून तज्ज्ञ उपचार उपलब्ध झाले आहेत.

### मान सन्मान

आम्हची लढाई जगण्यासाठी
माणुस म्हणून मांणसात उभ रहाण्यासाठी
सन्मान वैगरे काही नको
कशाला फुकट मिरवण्यासाठी
त्याची आम्हाला गरज नाही
पण थोड़ी इज्जत चार चौघात
आम्हची पण असु दया
माणुस म्हणून आम्हाला पण
काहीतरी किस्मत दया
जरी मी फाटका असलों
तरी मी लाचार नाही
विचाराची झोळी आयुष्याचा अनुभव
हीच माझी खरी शिदोरी
काय घेवुन जानार? तुम्हीं आणि मी
मी पणाचा अलंकार
कि शब्दांचा अलंकार
चार शब्द प्रेमाचे बोलु
शेवटी माणुस आहोत आपण
माणसा सारख जगु

कवीता - सुनील शांताराम पेडुरकर

# शितल अकॅडमीच्या ७ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उत्सव

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड येथील शितल अकॅडमीच्या शाखेचा ७ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने विविध शैक्षणिक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले कौशल्य सादर केले.

कार्यक्रमासाठी वैनतेय विद्यालय, निफाड येथील आदरणीय तनपुरे मॅडम तसेच ॲड. तिडके सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, सातत्यपूर्ण मेहनत आणि




आत्मविश्वास याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना नवचैतन्य मिळाले.यावेळी स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी अकॅडमीच्या संचालकांनी भावना व्यक्त करत सांगितले की, "गेल्या सात वर्षांपासून निफाड शहरातील पालक आणि विद्यार्थ्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून इंग्रजी शिक्षणाची जबाबदारी सोपवली. आपण दिलेल्या प्रेम, विश्वास आणि सहकार्यामुळेच शितल अकॅडमी आज यशस्वीपणे सात वर्षांचा टप्पा पूर्ण करू शकली आहे. या प्रवासात साथ देणाऱ्या सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि हितचिंतकांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे."कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन अत्यंत सुरळीतपणे पार पडले. विद्यार्थी, पालक आणि उपस्थित मान्यवरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे वर्धापन दिनाचा सोहळा संस्मरणीय ठरला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# 'हमसफर' माहितीपटाला राष्ट्रीय पुरस्कार; विजय पाटकर यांच्या अभिनयाची देशपातळीवर दखल

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते :** मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते विजय पाटकर यांनी अभिनय केलेल्या "हमसफर" या माहितीपटाला यंदाचा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या सन्मानामुळे मराठी चित्रपटसृष्टीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, कला क्षेत्रातून आनंद व्यक्त केला जात आहे.

"हमसफर" हा माहितीपट सामाजिक आशय, प्रभावी मांडणी आणि संवेदनशील विषयामुळे विशेष चर्चेत होता. या कलाकृतीत विजय पाटकर यांनी साकारलेली भूमिका प्रेक्षकांसह समीक्षकांनाही



भावली. त्यांच्या अनुभवसंपन्न आणि संयत अभिनयामुळे माहितीपटाला अधिक परिणामकारकता लाभल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा होताच विजय पाटकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे. अनेक कलाकार, दिग्दर्शक, निर्माते आणि चाहत्यांनी त्यांना शुभेच्छा देत या यशाचा आनंद साजरा केला. मराठी चित्रपटसृष्टीसाठीही हा सन्मान प्रेरणादायी मानला जात आहे.

या पुरस्कारामुळे दर्जेदार आशय असलेल्या माहितीपटांनाही राष्ट्रीय स्तरावर योग्य सन्मान मिळत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. "हमसफर"च्या निर्माते, दिग्दर्शक, लेखक आणि संपूर्ण तांत्रिक चमूचेही सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशाच दर्जेदार कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# खानावमध्ये शेकापला मोठा धक्का; ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊशेठ पाटील कुटुंबासह भाजपात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा मोठा राजकीय धक्का बसला आहे. तालुक्यातील खानाव येथील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि खंदे समर्थक भाऊशेठ पाटील यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबीयांसह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे कमळ हाती घेतले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात हा दिमाखदार पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाऊशेठ पाटील यांच्यासह भाजपमध्ये दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात अगत्याने स्वागत केले. भाऊशेठ पाटील यांनी जो विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश केला आहे, तो विश्वास पक्षसंघटनेच्या माध्यमातून पूर्णपणे सार्थ ठरवला जाईल, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी दिली. या पक्षप्रवेशामुळे खानाव परिसरासह संपूर्ण पनवेल तालुक्यात भाजपची ताकद आणखी मजबूत झाली आहे.

महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पाटील कुटुंबीयांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी खानावचे माजी सरपंच दत्तात्रेय पाटील, माजी उपसरपंच ताईबाई पाटील, माजी ग्रामपंचात सदस्य जयश्री पाटील, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, जनार्दन पाटील, ॲड. दिनेश पाटील, प्रतीक्षा पाटील, विठ्ठल पाटील, वासुदेव पाटील, मारुती पाटील, पंडित पाटील, कुंडलिक पाटील, लता पाटील,

## आ. प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत दिमाखदार पक्षप्रवेश; विकासकामांवरील विश्वासामुळे भाजपची वाढती ताकद



मोहिनी पाटील, अस्मिता पाटील, प्रज्ञा पाटील, सुरेखा पाटील, रंजना पाटील, स्नेहा पाटील, अर्चना पाटील, वंदना पाटील, विद्या पाटील यांच्यासह पाटील कुटुंबीयांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला.या सोहळ्याप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून सुरू असलेल्या धडाकेबाज विकासकामांच्या जोरावरच नागरिकांचा पक्षावरील आणि नेतृत्वावरील विश्वास अधिक घट्ट झाल्याचे सांगितले. विरोधकांकडून होणाऱ्या प्रत्येक टीकेला भाजपने नेहमीच भाषणाबाजीने नव्हे, तर थेट जमिनीवरील विकासकामांच्या माध्यमातून सडेतोड उत्तर दिले आहे, असे सांगत ही विकासकामांची मालिका यापुढेही अविरतपणे सुरूच राहील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, कमला देशेकर, निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या अस्मिता पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, अतुल घरत, माजी सरपंच गणू मुंढे, एकनाथ फराड, शशिकांत दिसले, बळीराम भोईर, दीपकशेठ तवले, गणेश तातरे, सुनील फराड, समीर मुंढे, निलेश वारदे, दिलीप तवले, विलास भोपी, विजय मुंढे, सचिन दिसले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# रामदास कदम यांच्या वक्तव्याचा श्रीवर्धनमध्ये तीव्र निषेध; राष्ट्रवादी काँग्रेसचा मोर्चा, कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : शिवसेना नेते रामदास कदम यांनी श्रीवर्धन मतदारसंघाचे खासदार सुनिलजी तटकरे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) श्रीवर्धन तालुक्याच्या वतीने सोमवारी निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले. पंचायत समिती श्रीवर्धन येथून सुरू झालेला हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जाऊन संपन्न झाला.

मोर्चामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सभापती सचिन कीर, तालुकाध्यक्ष मंदार तोडणकर, उदय बापट, श्रीवर्धन नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष अनंत गुरव, माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक, पंचायत



समिती सदस्य, नगरपालिकेचे नगरसेवक तसेच पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मोर्चानंतर झालेल्या सभेत स्थानिक नेत्यांनी रामदास कदम यांनी केलेल्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. कोणत्याही लोकप्रतिनिधीबाबत अशा प्रकारची बेताल, अवमानकारक आणि राजकीय संस्कृतीला न शोभणारी भाषा स्वीकारली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

यापुढे अशा प्रकारची वक्तव्ये पुन्हा झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते गप्प बसणार नसून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. सार्वजनिक जीवनात वावरताना जबाबदारीचे भान ठेवूनच वक्तव्य करावे, असा सल्लाही नेत्यांनी रामदास कदम यांना दिला.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात येणार असून, रामदास कदम यांनी केलेल्या बेताल वक्तव्याची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस श्रीवर्धन तालुक्याच्या वतीने करण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.मोर्चादरम्यान घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. संपूर्ण आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

# आता थेट इथेनॉलवर शिजणार घरचा स्वयंपाक

**मुंबई :** वाहनांसाठी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचा वापर वाढवल्यानंतर केंद्र सरकार आता घरगुती स्वयंपाकासाठीही इथेनॉलचा पर्याय उपलब्ध करून देण्याच्या तयारीत आहे. या उपक्रमामुळे आयात होणाऱ्या एलपीजीवरील अवलंबित्व कमी होण्याबरोबरच देशाच्या ऊर्जा सुरक्षेलाही बळकटी मिळू शकते. पेट्रोलियम मंत्रालय इथेनॉलला घरगुती इंधन म्हणून मान्यता देण्यासाठी आवश्यक नियम, पुरवठा व्यवस्था आणि वितरण यंत्रणा तयार करत असून, प्राथमिक आराखडा सप्टेंबरपर्यंत तयार होण्याची शक्यता आहे. काही भागांत इथेनॉलवर चालणाऱ्या स्वयंपाकाच्या चुलींच्या यशस्वी चाचण्या झाल्याची माहिती आहे. ऊस, मका आणि इतर धान्यांपासून तयार होणारे इथेनॉल हे तुलनेने स्वच्छ जैवइंधन मानले जाते. त्यामुळे धूर आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होऊ शकते. तसेच इथेनॉल उत्पादन वाढल्याने अतिरिक्त साठ्याचा वापर घरगुती स्वयंपाकासाठी करण्याचा पर्याय सरकार विचारात घेत आहे. या योजनेत तेल विपणन कंपन्यांमार्फत पेट्रोल पंपांवर विशेष इथेनॉल वितरण केंद्र उभारण्याचाही विचार आहे. ग्राहकांना विशेष कंटेनर किंवा कॅनद्वारे इथेनॉल उपलब्ध करून देण्याची व्यवस्था विकसित केली जाऊ शकते.

## सोन्याचे मंगळसूत्र खेचले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** 44 वर्षीय महिलेच्या गळयातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळून गेल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 19 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सिंधू गळवे ह्या सेक्टर दोन कळंबोली येथे राहत असताना त्या एचपी गॅस डिलिव्हरी सेंटर, सेक्टर दोन, कळंबोली येथून पायी चालत जात होत्या. यावेळी त्यांच्या गळयातील 13 ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून अनोळखी इसम पळून गेला.

# शिळफाटा वाहतूक समस्यांवर धर्माभिमानी भूमिपुत्र संघटनेचे चर्चासत्र;

## नगरसेवक बाबाजी पाटील यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत ग्रामीण प्रतिनिधी :** धर्माभिमानी भूमिपुत्र संघटनेच्या वतीने रविवार दि.१९जुलै रोजी शिळफाटा परिसरातील वाढत्या वाहतूक समस्यांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रात शिळफाटा परिसरातील तीव्र वाहतूक कोंडी, फुटपाथवरील वाढते अतिक्रमण तसेच गॅरेज व हॉटेल व्यावसायिकांकडून करण्यात येणारे अनधिकृत पार्किंग यांसारख्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चासत्रात उपस्थित नागरिकांनी वाहतूक कोंडीमुळे होणारा वेळेचा अपव्यय, अपघातांचा वाढता धोका आणि पादचाऱ्यांना फुटपाथ उपलब्ध नसल्याने निर्माण होणाऱ्या अडचणी मांडल्या. तसेच संबंधित विभागाने अतिक्रमण आणि अनधिकृत पार्किंगवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच कल्याण फाटा आणि शिळ फाटा सर्कलवर होणारी अवैध वाहतूक तपासणी



आणि त्याद्वारे केली जाणारी वसुली सुद्धा बंद करण्यात यावी नियमानुसार कुठल्याही सर्कलवर वाहन थांबून वाहनाची तपासणी करता येत नाही त्यासाठी सर्कल पासून काही अंतरावर अधिकृतपणे बॅरिकेटर लावून वाहन थांबून त्यांचे पेपर तपासून योग्य ती कारवाई करावी, तसेच नव्याने बसवण्यात आलेली सिग्नल यंत्रणा व्यवस्थित हाताळून ज्या दिशेला ट्रॅफिकचा ताण जास्त असेल तिकडनं ट्रॅफिक जास्त वेळ सोडण्यात यावी जसे की सकाळच्या वेळेस कल्याण डोंबिवली वरून येणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असते आणि संध्याकाळच्या वेळेस तीच वाहनांची संख्या महापे, वाशी या दिशेकडून असते, तसेच विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांवर सुद्धा कारवाई करण्यात यावी

विशेष म्हणजे, दहिसर आणि शिळ -देसाई विभागात जवळपास सहा नगरसेवक असतानाही या महत्त्वाच्या चर्चासत्राला विद्यमान नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील हे एकमेव लोकप्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून संबंधित प्रशासनाकडे त्या प्रभावीपणे मांडण्याचे आश्वासन दिले.

या चर्चासत्रातून शिळफाटा परिसरातील वाहतूक प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत एडवोकेट श्री.बाबुराव मुंडे आणि ज्येष्ठ समाजसेवक श्री. सुनील अलीमकर यांनी व्यक्त केले.

# सत्तेचा सौदा, सलोख्याचा बळी! नेते एकत्र, कार्यकर्ते मात्र आमनेसामने

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार :** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण राजकारणातील एक गंभीर वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. निवडणुका जाहीर झाल्यानंतर गावागावांत राजकीय वातावरण तापते. प्रचाराला वेग येतो, कार्यकर्ते पक्ष आणि नेत्यांसाठी रात्रंदिवस मेहनत घेतात, नातेवाईकांमध्ये मतभेद निर्माण होतात, मित्रांमध्ये दुरावा वाढतो आणि अनेकदा संपूर्ण गाव दोन गटांत विभागले जाते. मात्र या सर्व घडामोडींनंतर शेवटच्या क्षणी वरिष्ठ नेते एका टेबलावर बसतात आणि "बिनविरोध"चा फॉर्म्युला जाहीर करतात. त्यानंतर उरतो तो एकच प्रश्न— या राजकीय तडजोडीची खरी किंमत कोण मोजते?

बिनविरोध निवडणूक हा लोकशाहीविरोधी प्रकार नाही. उलट, सर्वानुमते नेतृत्व निवडले जाणे ही एक आदर्श परंपरा ठरू शकते. मात्र त्यासाठी सुरुवातीपासूनच संवाद, पारदर्शकता आणि सर्व संबंधित घटकांचा विश्वास आवश्यक असतो. जेव्हा शेवटच्या क्षणी राजकीय समीकरणे जुळवून उमेदवारी मागे घेतली जाते किंवा व्यवहारांच्या चर्चेनंतर तडजोड होते, तेव्हा सर्वाधिक निराशा कार्यकर्त्यांच्या वाट्याला येते.

गावपातळीवरील कार्यकर्ता हा



### कारण शेवटी नेते पुन्हा एकत्र येतात; पण तुटलेली मने जोडण्याची जबाबदारी कोण घेणार?

आजची खरी गरज सत्तेचे राजकारण करण्यापेक्षा विश्वासाचे राजकारण करण्याची आहे. निवडणूक जिंकणे हा विजयाचा एक भाग असू शकतो; परंतु समाज जोडणे, कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि गावात सलोखा निर्माण करणे हाच लोकशाहीचा खरा विजय आहे.हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे आणि तोच आपल्या ग्रामीण लोकशाहीपुढील सर्वात मोठे आव्हान ठरत आहे. बिनविरोध की राजकीय व्यवहार? लोकशाहीच्या आत्म्यापुढील मोठा प्रश्न

कोणत्याही पक्षाचा खरा आधारस्तंभ असतो. तो स्वतःच्या वेळेची, पैशाची आणि प्रतिष्ठेची पर्वा न करता पक्षासाठी काम करतो. प्रचारादरम्यान तो अनेकदा स्वतःच्या नातेवाईकांशी, मित्रांशी आणि शेजाऱ्यांशी मतभेद पत्करतो. काही ठिकाणी सामाजिक संबंधही ताणले जातात. परंतु शेवटी वरिष्ठ पातळीवर सर्व काही आधीच ठरले होते, अशी भावना निर्माण झाल्यास त्याचा परिणाम कार्यकर्त्यांच्या मनोबलावर होतो. ही केवळ राजकीय नव्हे, तर नैतिक हानीही असते.

ग्रामीण भागातील निवडणूक ही केवळ मतपेटीपुरती मर्यादित नसते. ती गावाच्या सामाजिक जीवनाशी जोडलेली असते. ग्रामपंचायत, सहकारी संस्था, बाजार समित्या, मंदिर समित्या, शाळा, सण-उत्सव आणि विकासकामांवर स्थानिक राजकारणाचा थेट प्रभाव पडतो. निवडणुकीच्या काळात निर्माण झालेली कटुता अनेक वर्षे टिकून राहते. निवडणूक संपते, निकाल लागतो, नेते पुढच्या राजकीय समीकरणांकडे वळतात; मात्र गावात निर्माण झालेली दरी कायम राहते.

जर बिनविरोध निवडणूकच अंतिम उद्दिष्ट असेल, तर त्यासाठी निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच सर्व पक्ष, इच्छुक उमेदवार आणि स्थानिक नेतृत्व यांच्यात चर्चा का होऊ नये? कार्यकर्त्यांना संघर्षाच्या रिंगणात उतरवून, वातावरण तापवून आणि शेवटच्या क्षणी तडजोड जाहीर करणे ही लोकशाहीची निरोगी पद्धत ठरू शकत नाही. संवाद हा शेवटच्या क्षणी नव्हे, तर सुरुवातीलाच व्हायला हवा. आजच्या राजकारणात पक्षनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठ राजकारण अधिक प्रभावी होत असल्याचे चित्र दिसते. अनेकदा कार्यकर्त्यांचा वापर हा केवळ राजकीय ताकद दाखवण्यासाठी केला जातो. सत्ता समीकरणे बदलली की नेते एकत्र येतात; परंतु कार्यकर्त्यांच्या मनातील नाराजी आणि गावातील सामाजिक दरी भरून काढण्यासाठी कोणी पुढे येत नाही. परिणामी, सामान्य नागरिक आणि कार्यकर्तेच कायमचे विभागले जातात.

लोकशाहीची खरी ताकद ही मतभेद स्वीकारण्यात, संवाद साधण्यात आणि पारदर्शक प्रक्रियेत आहे. बिनविरोध निवडणूक तेव्हाच आदर्श ठरते, जेव्हा ती दबाव, व्यवहार किंवा राजकीय सोय याऐवजी परस्पर विश्वास, सर्वानुमते निर्णय आणि सार्वजनिक हितावर आधारित असते. अन्यथा ती लोकशाहीच्या आत्म्यालाच कमकुवत करणारी प्रक्रिया ठरते.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीने एक महत्त्वाचा संदेश दिला आहे— राजकारणात तडजोडी अपरिहार्य असू शकतात; मात्र त्या करताना कार्यकर्त्यांचा सन्मान, लोकांचा विश्वास आणि गावातील सामाजिक सलोखा यांचा बळी देता कामा नये.

# सप्तश्रृंगी महिला ज्येष्ठ नागरिक संघाची नवी कार्यकारिणी जाहीर



**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** द्वारका (नाशिक) येथील सप्तशृंगी महिला ज्येष्ठ नागरिक संघाची विशेष सभा १७ जुलै २०२६ रोजी संस्थापक अध्यक्षा सविता धनंजय चतुर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. तसेच संघाला फेस्कॉम नाशिक प्रदेशशी संलग्न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही सर्वानुमते घेण्यात आला.

सभेला नानासाहेब होळकर, धनंजय चतुर आणि मनोहर वाघ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी ज्येष्ठ महिलांनी सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये अधिक सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत संघाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्षा म्हणून सविता चतुर, सचिव वंदना नागवंशी, उपाध्यक्षा

## फेस्कॉम नाशिक प्रदेशशी संलग्नतेचा एकमताने निर्णय; सामाजिक व सेवाभावी उपक्रमांना मिळणार नवे बळ

आशा शिंदे, कार्याध्यक्षा कौशल्या पाटील, खजिनदार संगीता शहाणे, उपखजिनदार विद्या देव, सहखजिनदार पुष्पा जाधव आणि संपर्क सचिव म्हणून छाया येवले यांची निवड करण्यात आली. तसेच संचालक मंडळावर लता कापडणे, विद्या दीपक, रत्नमाला सैंदाणे, शशिकला जगताप, ज्योती वाईकर आणि कल्पना जाधव यांची निवड करण्यात आली.

यावेळी वैशाली सूर्यवंशी, संध्या बोराडे, नीलिमा दीक्षित, तृप्तीताई बागुल, राजश्री मोरे यांच्यासह संघाच्या सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सभेत संघाच्या आगामी सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ज्येष्ठ महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

फेस्कॉम नाशिक प्रदेशशी संलग्न झाल्यामुळे संघाच्या कार्याला अधिक व्यापक व्यासपीठ मिळेल, असा विश्वास अशोकराव होळकर यांनी व्यक्त केला. तर धनंजय चतुर यांनी महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि संघटनेच्या भावी वाटचालीबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमादरम्यान सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी सचिव वंदना नागवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुस्कान शेख व छाया पांचाळ प्रसुती दरम्यान मातामृत्यू प्रकरणी दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा बीड (प्रतिनिधी)** - बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूती दरम्यान वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्युमुखी पडलेल्या मुस्कान सिद्दिक शेख आणि छाया गणेश पांचाळ यांच्या मृत्यू प्रकरणी जबाबदार संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्यचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली (दि.२० जुलै-२०२६) सोमवार रोजी जिल्हा रुग्णालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. या वेळी "मुस्कान शेख यांना न्याय द्या' "छाया पांचाळ यांना न्याय द्या", ' दोषीं वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागेश चव्हाण यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव आणि आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते युनुस शेख, मुबीन शेख, शिवशर्मा शेलार, भिमराव कुटे, किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था बहिरवाडी




### बीड जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन; मुख्यमंत्री, पालकमंत्री व आरोग्यमंत्र्यांना निवेदन.:- डॉ.गणेश ढवळे

मयत मुस्कान शेख व छाया पांचाळ यांचे नातेवाईक आंदोलनात सहभागी मुस्कान शेख यांचे पती सिद्दीक शेख, मामा मुन्ना शेख, चुलते जुबेर शेख, मोईन शेख, सत्तार शेख, रहिम शेख तसेच छाया पांचाळ यांचे पती गणेश पांचाळ, भाऊ आकाश कळसकर, कृष्णा दळवी, मसु पवार, गणेश घाडगे, बाळु कांबळे, सीता दहे, लहानाबाई कटकाळे, अमोल मुळे, शेख आक्रम सह आदी नातेवाईक सहभागी झाले होते.

**प्रमुख मागण्या**

- मुस्कान सिद्दिक शेख आणि छाया गणेश पांचाळ यांच्या मृत्यूप्रकरणी संबंधित दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.
- चौकशीच्या नावाखाली होत असलेल्या दिरंगाईबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी.
- चौकशी समित्यांची निष्पक्ष पुनर्रचना करावी.
- मृत्यू प्रकरणांतील जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

बीड), बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष, भीमशक्ती-शिवशक्ती विचारमंच), माजी सैनिक अशोक येडे, सादेक सय्यद (बीड शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी), पठाण रफिक (बीड जिल्हा उपप्रमुख आम आदमी पार्टी बीड), राजेंद्र आमटे ( शेतकरी हक्क आंदोलक), ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे, शेख आकरम, सत्तार रज्जाक, मोईन सरफोद्दीन, समाजसेवक सरफराज, शेख मुबारक, महेमुद मुबारक सह आदी सहभागी झाले होते. बीड जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे प्रसूती दरम्यान मुस्कान सिद्दिक शेख आणि छाया गणेश पांचाळ मृत्यूची प्रकरणे घडली असून, संबंधितांवर अद्याप गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. चौकशी समित्यांवर समित्या नेमून वेळ काढूपणा केला जात असल्याचाही आरोप त्यांनी या वेळी केला.

# शिकारा बँक्वेट अँड बॉलरूम’चे दिमाखात उद्‌घाटन नवी मुंबईतील आलिशान सोहळ्यांसाठी नवे आकर्षण

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** नवी मुंबईत आलिशान विवाहसोहळे, कॉर्पोरेट कार्यक्रम आणि सामाजिक समारंभांसाठी नव्या पर्वाची सुरुवात झाली असून शिकारा बँक्वेट अँड बॉलरूमचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले. सानपाडा–तुर्भे येथे शिकारा हॉटेल सर्वपरिचित आहे याच ठिकाणी नव्याने बँक्वेट अँड बॉलरूमचे उद्घाटन आतिथ्य क्षेत्रातील मान्यवर, उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, सेलिब्रिटी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि निमंत्रितांच्या उपस्थितीत झाले.

शिकारा ग्रुपचे संस्थापक श्री. अशोक मेहरा, शिकारा ग्रुपचे संचालक श्री. विशाल मेहरा तसेच मेहरा कुटुंबीयांनी उपस्थित पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. या भव्य उद्घाटन सोहळ्याला अभिनेत्री प्रायरिना भट, अमरदीप सिंग, संजीव कुमार, सुरिंदर सिंग, हरमीत सिंग यांच्यासह विविध क्षेत्रातील



अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली आणि हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

यावेळी बोलताना श्री. अशोक मेहरा म्हणाले, “शिकारा हे नाव नेहमीच उत्कृष्ट आदरातिथ्य आणि अविस्मरणीय अनुभवासाठी ओळखले जाते. शिकारा बँक्वेट अँड बॉलरूमच्या माध्यमातून आम्ही नवी मुंबईला एक जागतिक दर्जाचे, भव्य आणि आधुनिक सेलिब्रेशन डेस्टिनेशन देत आहोत. प्रत्येक समारंभ अविस्मरणीय बनविण्याचा आमचा प्रयत्न असून, उत्कृष्ट सेवा आणि दर्जेदार आतिथ्याची परंपरा कायम ठेवण्याचा आमचा संकल्प आहे.”

अभिनेत्री प्रायरिना भट म्हणाल्या, “शिकारा बँक्वेट अँड बॉलरूमची भव्यता, आकर्षक सजावट आणि आलिशान वातावरण खरोखरच प्रभावी आहे. उत्कृष्ट सुविधा आणि आत्मीय आदरातिथ्यामुळे हे नवी मुंबईतील सर्वोत्तम समारंभ स्थळांपैकी एक ठरेल, असा मला विश्वास आहे. शिकारा टीमला मनःपूर्वक शुभेच्छा.”

उपस्थित पाहुण्यांनी बँक्वेटच्या आलिशान हॉल्स, आकर्षक इंटिरियर्स आणि आधुनिक सुविधींची पाहणी केली. त्यानंतर लाईव्ह डीजे, उत्कृष्ट आदरातिथ्य, प्रीमियम खाद्यपदार्थ आणि भव्य डिनरचा सर्वांनी आनंद घेतला. या ठिकाणाची देखणी रचना, दर्जेदार सेवा आणि उत्कृष्ट पाककलेचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.सुमारे १,५०० पाहुण्यांच्या क्षमतेसह, लहान कौटुंबिक समारंभांपासून भव्य विवाहसोहळे, कॉर्पोरेट कार्यक्रम आणि प्रीमियम सामाजिक सोहळ्यांपर्यंत सर्व प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सज्ज असलेले शिकारा बँक्वेट अँड बॉलरूम हे नवी मुंबईतील सर्वाधिक पसंतीचे सेलिब्रेशन डेस्टिनेशन म्हणून उदयास येण्यास सज्ज आहे.

# मालमत्तांच्या ‘सुप्त मूल्य’ उपयोगितेचे सामर्थ्य ‘डेल्टा’ कायद्यात असावे –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** राज्याला २०३० पर्यंत ‘वन ट्रिलियन डॉलर’ अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट साध्य करताना नवनवीन उत्पन्नाचे स्त्रोत विकसित करावे लागणार आहेत. त्या अनुषंगाने स्थावर मालमत्तांमध्ये असलेले सुप्त मूल्य लक्षात घेऊन या मूल्याचा सार्वजनिक हितार्थ उपयोग करण्यासाठी नवीन डेल्टा (महाराष्ट्र डिजिटायझेशन आणि एक्सचेंज ऑफ लँड टोकन असेट्स) कायदा प्रस्तावित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या कायद्यामध्ये मालमत्तांच्या ‘सुप्त मूल्य’ उपयोगीतेचे सामर्थ्य असावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचित केले.सर्वसमावेशक आणि सर्व घटकांना अंतर्भूत करणाऱ्या अशा सर्वंकष कायद्याच्या निर्मितीसाठी सेबी, बीएससी, एनएससी आणि या क्षेत्रातील तज्ञ अनुभवी व्यक्तींचा समावेश असलेली समिती गठीत करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. डेल्टा कायदा मसुद्याचे सादरीकरण करण्यासाठी सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली. बैठकीस नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या.जगामध्ये यापुढे मालमत्तांचे टोकनायझेशन करून उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करीत जमिनीचे मूल्य वाढविले जाणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ब्लॉकचेन पद्धतीद्वारे स्थावर मालमत्तांना टोकन देऊन त्यांचे मूल्यवर्धन केले जाणार आहे. यासाठी सध्या जगामध्ये अस्तित्वात असलेले कायदे, नियम आणि पद्धतींचा अभ्यास करण्यात यावा. देशामध्ये अशा पद्धतीचे कायदा प्रस्तावित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. देशाला दिशादर्शक कायदे देण्याविषयी महाराष्ट्राचा नेहमी पुढाकार राहिला आहे. हा कायदाही महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करणारा ठरावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.ब्लॉकचेन पद्धतीद्वारे विकसित होणारी ही संपूर्ण व्यवस्था डिजिटल असणार आहे. या पद्धतीद्वारे जमिनीच्या मूल्यानुसार टोकन देऊन व्यवहार होतील. या संपूर्ण प्रक्रियेत अशा व्यवहारांना कायदेविषयक संरक्षण असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेत डेल्टा कायदा आणण्याचे प्रस्तावित केले आहे. हा कायदा बनवीत असताना त्यामध्ये कसलीही कमतरता राहू नये यासाठी या क्षेत्रातील असलेल्या संस्था नामवंत तज्ञ, अभ्यासक, स्टार्ट अप यांच्या अनुभवाचा उपयोग करावा.

# मदत शिक्षकांची

मी स्वतः पनवेल तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये पाच वर्ष गणित -विज्ञान शिक्षक म्हणून सेवा केलेली आहे. त्यानंतर पनवेल शहरांमध्ये नवीन पनवेल येथे एकाच शाळेत 28 वर्ष माध्यमिक विभागामध्ये गणित शिक्षक म्हणून सेवा केली व सेवेची शेवटची चार वर्ष गणित शिक्षक आणि पर्यवेक्षक म्हणून सेवा करण्याची मला संधी मिळाली. एकूण सेवा सदोतीस वर्षे झाली सध्या सेवानिवृत्त आहे.

जुलै च्या पहिल्या आठवड्यामध्ये जिल्हाधिकारी साहेब यांची दोन पत्रे वाचनात आली म्हणून हा लेख लिहावासा वाटला. त्या पत्रामधील मजकूराचा काही भाग असा आहे की,रायगड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी चालू आहे आणि हवामान खात्याच्या अंदाजानुसार अजून दोन दिवस अतिवृष्टी व जोराचा सोसाट्याचा वारा सुटणार आहे कोणत्याही विद्यार्थ्याला याची इजा पोहोचू नये म्हणून जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळा व महाविद्यालयांना सुट्टी राहील. याच या पत्रामधील पुढची ओळ फार महत्त्वाची आहे बर का, त्यांनी म्हणजे साहेबांनी पुढे असे लिहिलेले आहे की, परंतु सर्व शिक्षकांनी आपापल्या शाळेत जायचं आहे आणि गरज पडल्यास स्थानिक आपत्ती व्यवस्थापनाला मदत करायची आहे.

प्रश्न असा पडतो की शिक्षकांना आपत्ती व्यवस्थापनाचे कोणतेही प्रशिक्षण कधीही दिले गेलेले नाही असे मला वाटते हा एक भाग झाला आणि दुसरा आणि अति महत्त्वाचा भाग असा आहे की,शिक्षकांना शाळेत जाताना पाऊस,नदी,नाले ओढे व सोसाट्याचा वारा नाही का? म्हणजे शिक्षकांना याची इजा झाली तरी चालेल पाण्यात वाहून गेले तरी चालतील असंच म्हणायचं का?

म्हणजे शिक्षकांच्या बाबतीत असे आहे की जिथे कमी तिथे आम्ही किंवा जिथे गरज तेथे शिक्षक. कारण सन 2021 - 22 मध्ये कोरोना जास्त प्रमाणात पसरत होता त्यावेळी लोकांनी प्रवास करू नये म्हणून नाकाबंदी केली जात होती. त्यावेळी नाकाबंदी करण्यासाठी त्यांच्या नोंदी ठेवण्यासाठी, वाहने थांबवण्यासाठी, पोलिसांना मदत करण्यासाठी शिक्षकांच्या नेमणुका केल्या गेल्या होत्या. तसेच कोणतीही निवडणूक येऊ द्या महसूल खात्याकडून निवडणुकीच्या जबाबदारीच्या कामांसाठी शिक्षकांची नेमणूक केली जाते. तसेच मतदार याद्या दुरुस्त करण्यासाठी, नवीन मतदार नोंदणी करण्यासाठी, मतदान कार्ड वाटप करण्यासाठी, घरगणना करण्यासाठी,जनगणना करण्यासाठी, गुराढोरांची कोंबड्या कुत्र्यांची संख्या मोजण्यासाठी शिक्षकांचीच नेमणूक केली जाते. पूर्वी तर मला असे आठवते की काही वर्षांपूर्वी महिलांना कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी तयार करणे हे सुद्धा काम दिलेले होते. यासाठी हॉस्पिटलमध्ये मी आणि माझी पत्नी गेलो सुद्धा होतो.

शिक्षकांची नेमणूक ही विद्यार्थ्यांना विषयाचे अध्यापन करण्यासाठी, त्यांना चांगल्या सवयी लावण्यासाठी, भविष्यातील आदर्श नागरिक बनवण्यासाठी, केलेली असते असे मला वाटते. परंतु वरील सर्व कामे अध्यापनाचा विचार नकरता शिक्षकांच्याकडून दम देऊन करून घेतली जातात. शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त सुद्धा शाळेत खूप कामे असतात याचा कधी विचार होईल की नाही असा प्रश्न जवळपास सर्व शिक्षकांना पडलेला आहे. आता ज्यांना अनुभव नाही ते लोकं असे म्हणतील की काय काम असतं शिक्षकांना?

त्याचे उत्तर आहे-- शिक्षकांना अध्यापन करणे, गृहपाठ तपासणे, हजेरी घेणे, स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करणे, उजळणी घेणे, परीक्षा घेणे, पेपर तपासणे, निकाल पत्रक बनवणे, गुणपत्रक तयार करणे, शाळेतील सर्व उपक्रम राबवणे क्रीडा स्पर्धा घेणे,प्रेरणादायी व्याख्याने ठेवणे , पालक सभा आयोजित करणे, माता पालक सभा घेणे,शासकीय व अशासकीय स्पर्धा परीक्षेला मुलांना बसवून त्याची तयारी करून घेणे,आधार कार्ड नोंदी ठेवणे,यु-डायस प्लस ला सर्वांच्या नोंदी करून घेणे, अपार आय डी बनवणे, मुख्यमंत्री सुंदर शाळा लिंक वरती सर्व माहिती भरणे, स्कॉफ ची सगळी माहिती ऑनलाईन भरणे, प्रशिक्षणाला हजर राहणे, पोषण आहाराच्या नोंदी ठेवणे, नवीन विद्यार्थ्यांच्या नोंदी करणे, जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या करणे, शाळेमध्ये अनेक घटना घडतात त्याला सामोरे जाणे, अशी अनेक कामे शिक्षकांना असतात यापेक्षा वेगळी कामे सुद्धा अनेक आहेत. शिक्षण खात्याचे अनेक उपक्रम असतात त्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे, जसे विज्ञान प्रदर्शन आहे, इन्स्पायर अवार्ड आहे,विज्ञान परिषदेच्या विज्ञान खेळणी बनवणे उपक्रम असतो, तक्ते तयार करून घेणे, वैज्ञानिक नाटक बसवणे व उपक्रमामध्ये सहभागी होणे.

तसेच एम पी एस सी, यु पी एस सी, रेल्वे, पोस्ट, वैज्ञानिक ए, वैज्ञानिक बी, TET, TAIT, NMMS अशा अनेक परीक्षा शिक्षकांना घ्याव्या लागतात. बोर्डाच्या परीक्षा घेणे. बोर्डाचे व शाळेच्या परीक्षेचे पेपर एकाच वेळेला तपासायला येत असतात ते वेळेपूर्वी तपासून गुण याद्या बनवून द्याव्या लागतात. मग मला सांगा फेब्रुवारी मार्चमध्ये अनेक कामे एकाच वेळी शिक्षकांना करावी लागतात अशा वेळी इतर खात्यातील लोकांना एखादे पत्र का निघत नाही की, शिक्षकांना मदत करण्यासाठी तुमची नेमणूक करण्यात आलेली आहे सदर काम वेळेत केले नाही तर आपल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**लेखक - श्री जालिंदर केरू कुंभार (सेवानिवृत्त पर्यवेक्षक )**

## महाराष्ट्र सुपरफास्ट'चा म्हसळयात सामाजिक बांधिलकीचा आदर्श
### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पत्रकारांना नियुक्तीपत्र व ओळखपत्रांचे वितरण !.

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी रणिता ठाकूर** : पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि सामाजिक उत्तरदायित्व जपत कार्य करणाऱ्या 'महाराष्ट्र सुपरफास्ट' चॅनेलच्या वतीने म्हसळा येथे सामाजिक बांधिलकी जपणारा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच चॅनेलच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे व ओळखपत्रांचे वितरण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी म्हसळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव, पंचायत समितीचे माजी सभापती महादेव पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुनील उमरोठकर गुरुजी आणि मीडिया तंत्रज्ञ भावेश म्हस्कर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




मान्यवरांच्या स्वागतानंतर चॅनेलचे सचिव धनाजी घरत यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर कार्यकारी संपादिका तृप्ती भोईर यांनी 'महाराष्ट्र सुपरफास्ट' चॅनेलचा शून्यातून सुरू झालेला प्रेरणादायी प्रवास, आलेली आव्हाने आणि त्यावर मात करत मिळवलेले यश याविषयी उपस्थितांना माहिती दिली.कार्यक्रमात खारगाव बुद्रुक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य तसेच वाचन संस्कृती वाढीस लागावी या उद्देशाने गोष्टींच्या पुस्तकांचे वितरण करण्यात आले. पंचायत समितीचे माजी सभापती महादेव पाटील यांनी चॅनेलच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर सामाजिक कार्यकर्ते सुनील उमरोठकर गुरुजी यांनी, "संपादक संजय खांबेटे, कार्यकारी संपादिका तृप्ती भोईर आणि त्यांची संपूर्ण टीम बातम्या व व्हिडिओच्या दर्जासाठी सातत्याने मेहनत घेत असून त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे," असे गौरवोद्गार काढले.

यावेळी पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव यांनी नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन करत 18 वर्षांखालील मुलांना कोणत्याही परिस्थितीत वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहन केले. तसेच परिसरात अमली पदार्थांचे सेवन किंवा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमात मीडिया तंत्रज्ञ भावेश म्हस्कर आणि एडिटर मितेश नवले यांनी पत्रकारांना आधुनिक मीडिया तंत्रज्ञान, डिजिटल पत्रकारिता आणि दर्जेदार वृत्तांकनाबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थापक संपादक संजय खांबेटे, उपसंपादक धनराज गोपाळ, कार्यकारी संपादिका तृप्ती भोईर, सचिव धनाजी घरत, खजिनदार ॲड. रणिता ठाकूर, पत्रकार सिद्धेश पवार, संतोष चौकर, मंजुळा म्हात्रे तसेच महाराष्ट्र सुपरफास्ट चॅनेलच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. याशिवाय केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल उदय करडे व त्यांच्या सहकाऱ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वी आणि संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

## कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखेची वर्षासहल उत्साहात संपन्न
### साहित्यिक अभिव्यक्तीला नवी ऊर्जा देणारी वर्षासहल - प्राचार्या डॉ.प्रीती महाजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेची वर्षासहल पनवेलजवळील वाजापूर येथील पाटील फार्महाऊस येथे निसर्गरम्य वातावरणात उत्साहात संपन्न झाली.साहित्य, निसर्गाचा सुंदर संगम अनुभवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सहलीला सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या वर्षा सहलीला शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्रीती महाजन,पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव भरत पाटील,कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी,ज्येष्ठ साहित्यिक,कवी आदी सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्या डॉ.प्रीती महाजन यांनी आपल्या भाषणात,साहित्यप्रेमींच्या स्नेहबंधांना अधिक दृढ करणारी आणि निसर्गाच्या सानिध्यात साहित्यिक अभिव्यक्तीला नवी ऊर्जा देणारी ही वर्षासहल सर्वांच्या स्मरणात राहील,अशा भावना व्यक्त केल्या तर भरत पाटील यांनी,या उपक्रमास शुभेच्छा देऊन निसर्गाच्या सानिध्यात होत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.शाखेच्या सदस्या चित्रलेखा जाधव यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सहलीची सुरुवात वृक्षारोपणाने करण्यात आली. त्यानंतर साहित्यिक व कवींचा परिचय, साहित्यविषयक संवाद,कवी संमेलन तसेच निसर्गभेट,गाणी अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.हिरवाईने नटलेला परिसर,वाहते पाणी,पावसाच्या सरी आणि आल्हाददायक वातावरणात कवींनी आपल्या कविता सादर करत वर्षासहलीचा मनमुराद आनंद लुटला. वर्षा सहलीनिमित्त एका साहित्यप्रेमीने, सदस्यास छत्रीची भेट दिली.

या प्रसंगी सहभागी सदस्यांनी साहित्य,संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण केले. दिवसभराच्या उपक्रमात स्वादिष्ट भोजन आणि गरमागरम भजी,चहाचा आस्वाद घेत सर्वांनी सहलीच्या आनंददायी आठवणी मनात साठवून या साहित्यिक उपक्रमाचे कौतुक केले.

## धुळयात 82 किलो डोडा जप्त; नाशिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी नाशिक** : 'नशामुक्त नाशिक' अभियानांतर्गत अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात नाशिक शहर गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी आणि धडक कारवाई करत धुळे जिल्ह्यातील साक्री येथून तब्बल 82 किलो 264 ग्रॅम डोडा (पॉपी स्ट्रॉ), रु. 1 लाख 50 हजारांची रोख रक्कम, वजन काटा आणि दोन चारचाकी वाहने असा एकूण अंदाजे रु. 12 लाख 33 हजार 960 किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत राजस्थानमधील दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, आणखी एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या साखळीचा उलगडा करण्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.



नाशिक शहराचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार शहरात अंमली पदार्थांच्या विक्री व तस्करीवर कठोर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत उपनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक 380/2026 मधील एनडीपीएस कायद्याच्या गुन्ह्याचा तपास अंमली पदार्थ विरोधी पथकाकडे सोपविण्यात आला होता. या तपासादरम्यान फरार आरोपी मुकेश गोवर्धनराम विष्णोई व भरत भिकाराम विष्णोई (रा. जोधपूर, राजस्थान) यांचा शोध सुरू होता.

सहायक पोलीस निरीक्षक विशाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार भरत डंबाळे, पोलीस अंमलदार गणेश वडजे आणि अन्य कर्मचाऱ्यांचे विशेष पथक राजस्थान येथे रवाना करण्यात आले. तेथे आरोपींबाबत गोपनीय माहिती संकलित करण्यात आली. त्यांच्या वापरातील मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले असता, संबंधित आरोपी 17 जुलै रोजी धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात असल्याचे निष्पन्न झाले.

या माहितीच्या आधारे पोलीस पथक तातडीने राजस्थानहून साक्री येथे दाखल झाले. 18 जुलै रोजी माहितीदारांच्या मदतीने व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कोंडाईबारी येथील समरथळा हॉटेल परिसरात सापळा रचण्यात आला. तेथे दोन्ही आरोपी मिळून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

पुढील चौकशीदरम्यान आरोपी मुकेश विष्णोई याने साक्री येथील सुयोग कॉलनीतील भाड्याच्या घरात मोठ्या प्रमाणात डोडा (पॉपी स्ट्रॉ) साठवून ठेवल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलीस पथकाने संबंधित घराची झडती घेतली असता काळ्या रंगाच्या पाच गोण्यांमध्ये भरून ठेवलेला 82 किलो 264 ग्रॅम डोडा (पॉपी स्ट्रॉ) जप्त करण्यात आला. या अंमली पदार्थाची अंदाजे किंमत रु. 12 लाख 33 हजार 960 इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.याशिवाय आरोपींकडून रु. 1 लाख 50 हजारांची रोख रक्कम, अंमली पदार्थांचे वजन करण्यासाठी वापरला जाणारा इलेक्ट्रॉनिक वजन काटा तसेच दोन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे अंमली पदार्थांच्या मोठ्या साठ्याचा पुरवठा होण्यापूर्वीच पोलिसांनी तो हाणून पाडला आहे.प्राथमिक चौकशीत हा अंमली पदार्थ राजस्थानमधील सुरेश नावाच्या व्यक्तीकडून आणल्याची माहिती आरोपींनी दिली. त्यानुसार मुकेश गोवर्धनराम विष्णोई, भरत भिकाराम विष्णोई आणि सुरेश यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम 8 (c), 15 (c) व 29 अन्वये साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलीस करीत आहेत.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन चौधरी, सहायक पोलीस निरीक्षक विशाल पाटील, पोलीस हवालदार भरत डंबाळे, बळवंत कोल्हे, पोलीस नाईक संतोष सैंदाणे, पोलीस अंमलदार गणेश वडजे, योगेश सानप, अविनाश फुलपगारे, चंद्रकांत बागडे तसेच महिला पोलीस अंमलदार अर्चना भड यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली.

## कै. अंजनाबाई गंगाधर आक्कमवाड दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**

**मेंडका प्रतिनिधी** : मौजे मेंडका येथील रहिवासी कै. अंजनाबाई गंगाधर आक्कमवाड यांचे रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने आक्कमवाड परिवारासह गावात हळहळ व्यक्त होत आहे.



त्यांचा अंत्यविधी सोमवार, दि. २० जुलै २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता, मौजे मेंडका येथे संपन्न होणार आहे.

कै. अंजनाबाई गंगाधर आक्कमवाड यांच्या पश्चात कुटुंबीय असा मोठा परिवार असून, त्यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

ईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो व आक्कमवाड परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

## कॅप्टन ऑर्केस्ट्रा अँड रेस्टॉरंटवर पोलिसांचा छापा, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : कळंबोली येथील कॅप्टन ऑर्केस्ट्रा बार अँड रेस्टॉरंटवर गुन्हे शाखा कक्ष दोनने छापा टाकत कारवाई केली. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात 19 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. महिला वेटर या अंगविक्षेप करून बार मधील ग्राहकांशी भिभत्स हावभाव आणि अश्लील चाळे करत असताना मिळून आल्या. तसेच बार मधील आरोपी मॅनेजर, वेटर हे महिला वेटर यांना तसे करण्यासाठी प्रोत्साहन देऊन बार नियमांचे उल्लंघन करून चालवत असताना मिळून आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पनवेलचा 'फुटपाथ आणि हप्ता पॅटर्न' उध्वस्त करणार; मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचा ३ ऑगस्टला महापालिकेवर एल्गार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** शहरातील वाढती बेकायदेशीर बांधकामे, रस्त्यांवर आणि पादचाऱ्यांच्या फुटपाथवर झालेले अक्राळविक्राळ अतिक्रमण आणि यामुळे सामान्य पनवेलकरांच्या जिवाशी होणाऱ्या खेळाविरोधात 'मानवी हक्क संरक्षण फेडरेशन' आणि 'केंद्रीय लोकशाही पत्रकार संघ' यांनी थेट प्रशासनाविरुद्ध शिंग फुंकले आहे. शिष्टमंडळाने थेट पालिका आयुक्तांना घेराव घालत मागण्यांचे रोखठोक निवदेन सादर केले. येत्या २ ऑगस्ट २०२६ पर्यंत या बेकायदेशीर प्रवृत्तींवर ठोस कारवाई झाली नाही, तर सोमवार, ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता पालिकेच्या मुख्य वेशीवर धडक मोर्चा धडकणार असा इशारा यावेळी देण्यात आला.

या बैठकीच्या निमित्ताने पालिकेच्या अतिक्रमण विभागाचा एक अत्यंत लाजिरवाणा आणि भ्रष्ट कारभार पुराव्यासह उघडकीस आणण्यात आला आहे. उरण नाका, तक्का, एस.टी. बस डेपो, नवीन पनवेल आणि वडाळे तलाव परिसरात सायंकाळच्या वेळी मुख्य रस्ता अडवून उभ्या राहणाऱ्या बेकायदेशीर आईस्क्रीम गाड्यांवर पालिका प्रशासन मेहरवान का असते, याचे गुपित उघड झाले आहे. अतिक्रमण विभागातील काही महाभाग दर महिन्याला या गाड्यांवरून कारवाई टाळण्यासाठी हप्ते लाटत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या लाचखोरीचे थेट व्हिडिओ पुरावेच शिष्टमंडळाने आयुक्त यांच्या सुपूर्द केल्याने पालिकेच्या वर्तुळात एकच खळबळ उडाली असून भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

**निवेदनातील मुख्य आणि आक्रमक मागण्या**

मार्केट यार्डातील बेकायदेशीर गोडाऊनवर बुलडोझर फिरवा:** मार्केट यार्ड येथील प्लॉट क्र. ४८० येथे 'एमआरटीपी' (MRTP) कायद्याचे सरळ-सरळ उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या अवाढव्य बेकायदेशीर गोडाऊनवर २ ऑगस्टपर्यंत निष्कासनाची ठोस कारवाई झालीच पाहिजे, अन्यथा ३ ऑगस्टला पालिकेच्या दारात उग्र आंदोलन छेडले जाईल.

मिठाईवाल्यांची 'फुटपाथ'वरील दादागिरी मोडून काढा:* 'मार्जिनल स्पेस'चा गैरवापर करून सामान्य पादचाऱ्यांचे फुटपाथ गिळंकृत करणाऱ्या बिकानेर, गिरनार, मिठास, ब्रिजवासी यांसारख्या नामांकित मिठाई विक्रेत्यांवर दंडात्मक व जप्तीची कडक कारवाई करावी, जेणेकरून जनतेला सुरक्षित रस्ता मिळेल.

वसुलीबहाद्दर कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई:* 'प्रभाग समिती ड' मधील अतिक्रमण विभागातील कर्मचारी मोठ्या माशांना सोडून स्थानिक छोट्या गरीब व्यापाऱ्यांना नाहक त्रास देत असून, अशा लाचखोर कर्मचाऱ्यांची तात्काळ हकालपट्टी व्हावी, अशी मागणी करण्यात आली.



## 'आईस्क्रीम' लाचखोरीचे व्हिडिओ पुरावे थेट आयुक्तांच्या हातात पालिका वर्तुळात प्रचंड खळबळ
## धनदांडग्या मिठाईवाल्यांच्या अतिक्रमणाने पादचाऱ्यांचा जीव टांगणीला; डॉ. मुनीर तांबोळींचा प्रशासनाला थेट इशारा

**अतिरिक्त आयुक्तांच्या पत्राला केराची टोपली?**

पालिकेतील अंतर्गत अनागोंदी कारभारावर कडाडून बोट ठेवताना शिष्टमंडळाने विचारले की, अतिरिक्त आयुक्तांनी पाठवलेल्या अधिकृत पत्रांना प्रभाग अधिकारी आणि अधीक्षक उत्तर देण्याचे सौजन्य दाखवत नाहीत, म्हणजेच प्रशासनावर कोणाचेच नियंत्रण राहिले नाही का? अशा मुजोर अधिकाऱ्यांवर आयुक्तांनी स्वतः कडक कारवाई करावी. तसेच एका बिल्डरने टेरेसवर बांधलेल्या अनधिकृत फ्लॅटवरही तात्काळ कारवाईची मागणी लावून धरण्यात आली. आयुक्तांनी या सर्व विषयांवर सकारात्मक उत्तर दिले असले, तरी आता केवळ आश्वासनांची मिठाई चालणार नाही, प्रत्यक्ष कारवाई न झाल्यास रस्त्यावर उतरून हिशोब चुकता करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

**लढ्यात आघाडीवर असलेले शिष्टमंडळ**

या बैठकीचे नेतृत्व मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांनी केले. त्यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर, राष्ट्रीय महासचिव गुरदीप सिंह, महाराष्ट्र सचिव निलेश भगत, पनवेल शहर अध्यक्ष आशिष मोहोकार, महिला तालुका अध्यक्षा नेहा किरनली, मुद्दसिर पटेल, 'रायगडचा किल्लेदार'चे संपादक कृष्णा गायकवाड, 'रायगडचा शिल्पकार'चे संपादक विकास पाटील, ज्येष्ठ पत्रकार हितेंद्र निकम, पत्रकार सुरज नागे, पत्रकार सुनील पाटील, ॲड. समीर कुंभार आदींसह अनेक पत्रकार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरसोली नं. १ शाळेला जिल्हा परिषदेचा वरिष्ठ गटासाठी 'आदर्श शाळा पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**दापोली,(केतन भोज) :** तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा शिरसोली नं. १ या शाळेने आपल्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या जोरावर वरिष्ठ गटातून सन २०२४-२५ चा रत्नागिरी जिल्हा परिषद '*आदर्श शाळा पुरस्कार*' पटकावला आहे.हा मानाचा पुरस्कार १३ जुलै २०२६ रोजी रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उद्योग व मराठी भाषा मंत्री माननीय नामदार श्री.उदयजी सामंत यांच्या उपस्थितीत आयोजित एका भव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.या सोहळयाला जिल्हा परिषद अध्यक्षा माननीय सौ.अस्मितताई केंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे, माननीय आमदार भैय्यासाहेब सामंत, जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. विलास चाळके, शिक्षण सभापती श्री. नंदकुमार मुरकर आणि पालगड गट जिल्हा परिषद सदस्य मीनाक्षीताई शेडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. त्यांच्या हस्ते शाळेच्या प्रतिनिधींना हा गौरवपूर्ण पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यशाची यशस्वी घोडदौड शाळेने मागील वर्षभरात जवळपास 5 लाखाचा शैक्षणिक उठाव करून शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, विविध शैक्षणिक व क्रीडा उपक्रम, स्पर्धा परीक्षा, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, आकर्षक रंगरंगोटी, पटसंख्या वाढविण्यासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न तसेच सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या वैविध्यपूर्ण उपक्रमांमुळे वरिष्ठ गटात हा सर्वोच्च बहुमान मिळवला आहे.याशिवाय, पंचायत समिती दापोलीच्या 'व्हिजन दापोली' उपक्रमांतर्गत सर्व उपक्रमांची अत्यंत यशस्वी अंमलबजावणी करून शाळेने तालुक्यात आदर्श कामगिरीची नोंद केली आहे.

या यशामागे संपूर्ण शिरसोली व शिरसेश्वर ग्रामस्थ व पालक यांचे मोलाचे सहकार्य व पाठबळ लाभले.पुरस्कार वितरण सोहळ्यास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विवेक भावे, तसेच अरविंद जाधव, सुहास जाधव, गणू भावे, शरद भावे, विनायक शिगवण, प्रभाकर वनगुले, सुजित भावे, मंजुश्री जाधव, शिवाजी भेलेकर आदी उपस्थित होते.दापोली तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव शाळेचे मुख्याध्यापक मजीद नांदगावकर आणि शिक्षक गणेश तांबीटकर व विजय फंड यांच्या समर्थ नेतृत्वाखाली आणि उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली शाळेने मिळविलेल्या या दैदीप्यमान यशाबद्दल संपूर्ण दापोली तालुक्यातून तसेच शिक्षण क्षेत्रातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# "माजी आमदार संदीप गणेश नाईक यांचा हरित संकल्प; सेवा सप्ताहात वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त माजी आमदार संदीप गणेश नाईक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "सेवा सप्ताह" उपक्रमाला बेलापूर परिसरात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजोपयोगी, पर्यावरणपूरक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांनी या सेवा सप्ताहाला विशेष सामाजिक स्वरूप प्राप्त झाले.सेवा सप्ताहांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांपैकी वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन अभियान हे विशेष आकर्षण ठरले. वाढते शहरीकरण, घटणारे हरित क्षेत्र आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणाची गरज अधिक तीव्र झाली असताना या अभियानातून नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



यावेळी विविध प्रकारच्या सावली, फळझाडे व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून भविष्यातील पिढ्यांच्या सुरक्षित आणि निरोगी आयुष्यासाठीची गुंतवणूक असल्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला. उपस्थितांनी वृक्ष लागवडीनंतर त्यांच्या संगोपनाची जबाबदारीही स्वीकारत पर्यावरण संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे दाखवून दिले.

याप्रसंगी बोलताना माजी आमदार संदीप गणेश नाईक म्हणाले, "आज लावलेले प्रत्येक झाड उद्याच्या पिढीला शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि निरोगी जीवन देणारी अमूल्य देणगी ठरणार आहे. पर्यावरण संरक्षण हा केवळ एखादा उपक्रम किंवा अभियान नसून तो आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली तरच पर्यावरण संतुलन राखणे शक्य होईल."

सेवा सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत जनकल्याणाला प्राधान्य देण्याचा संदेश देण्यात आला. पर्यावरण संरक्षणासह समाजातील विविध घटकांना स्पर्श करणारे उपक्रम राबवून समाजसेवा आणि लोकसहभाग यांचा सुंदर संगम साधण्यात आल्याचे उपस्थितांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून, "एक व्यक्ती – एक झाड" हा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. बेलापूर परिसरात झालेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करत पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# भंडारा येथे दोन दिवसीय थिएटर कार्यशाळेचे उद्घाटन थाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा :** आजच्या तरुण पिढीमध्ये संगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट निर्मिती तसेच यूट्यूब व डिजिटल माध्यमांबाबत विशेष आकर्षण निर्माण होत आहे. आधुनिक युगात मनोरंजन क्षेत्रातून रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत असल्याने युवक-युवतींना या क्षेत्राची ओळख व प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने कलापथक टीम भंडारा च्या वतीने सार्वजनिक वाचनालयाच्या इंद्रराज सभागृहात दोन दिवसीय थिएटर कार्यशाळेचे (वर्कशॉपचे) उद्धाटन मोठ्या उत्साहात पार पडले.

थिएटर कार्यशाळेच्या उद्धाटनप्रसंगी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल, नगर परिषद भंडाराच्या नगराध्यक्ष मधुराताई मदनकर, सहायक पोलीस निरीक्षक सुरेन्द्र राऊत,भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन भैरम, नगरसेविका लक्ष्मीताई भागवत, नंदगोपाल फाऊंडेशनचे संस्थापक उपाध्यक्ष डॉ. यशवंत लांजेवार, महिला अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा चांदेकर, सामाजिक कार्यकर्त्या मेधा भागवत, डॉ. ओमप्रकाश गिऱ्हेपुंजे, डॉ. आशिष सावरकर (ब्लेस हॉस्पिटल, मौदा), पोलीस विभागातील सुरेंद्र राऊत, नगरसेवक नितीन गायधने, कॅप्टन विनोद गवरे, डॉ. तन्नू गवरे, हैदराबाद फिल्म सिटी येथील तज्ज्ञ व सुप्रसिद्ध सिनेकर्ते तसेच पुष्पा-१ व पुष्पा-२ चित्रपटांचे कोरिओग्राफर श्री. सागर चव्हाण, भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, कोरिओग्राफर व मीडिया उद्योजक हनी खट्टर, सुप्रसिद्ध डान्स ट्रेनर व एडिटर दीप अंबुले, डीओपी सिनेमॅटोग्राफर रोहित दुधबर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन, नटराज पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विशेष अतिथी म्हणून भंडारा विधानसभेचे आमदार नरेंद्र भोंडेकर, सुप्रसिद्ध अँकर परेश, मोहित जगणे तसेच जिद्दी कलाकार टीमचे सदस्य उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये चित्रपट क्षेत्रातील करिअरच्या संधी, ऑडिशन प्रक्रिया व तयारी, हिंदी स्क्रिप्ट, ॲक्टिंग, सेल्स मॅन, मेडिटेशन, चाय की टपरी यांसारख्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष कृतीतून आपल्यातील कलाकार जागृत केला आहे, असे मार्मिक मत भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, कोरिओग्राफर व मीडिया उद्योजक हनी खट्टर यांनी व्यक्त केले.

तसेच कॅमेरा, साउंड व लाईटचे मूलभूत ज्ञान, व्हिडिओ एडिटिंग, नृत्य दिग्दर्शन (कोरिओग्राफी), ड्रेसिंग व नेपथ्य वापर, मेकअप तंत्र आदी विषयांवर हैदराबाद फिल्म सिटी येथील तज्ज्ञ व सुप्रसिद्ध सिनेकर्ते सागर चव्हाण (चित्रपट पुष्पा-१ व पुष्पा-२ चे कोरिओग्राफर) तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण व सविस्तर मार्गदर्शन केले. शेवटी त्यांनी विविध डान्स स्टेप्स शिकविल्या आणि सर्व सहभागी दोन गाण्यांच्या तालावर उत्स्फूर्तपणे नृत्य केले. त्यामुळे भंडाऱ्यातील नवोदित कलाकारांमध्ये एक नवी उर्मी आणि आत्मविश्वास पाहावयास मिळाला. जिल्ह्यातील युवक-युवतींनी थिएटर वर्कशॉपमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत कार्यशाळेचा मनसोक्त आनंद लुटला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विविध प्रेरणादायी उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिष्म लांडगे यांनी केले, तर प्रास्ताविक कलापथक टीम भंडाराचे संचालक सुरेंद्र कूलरकर यांनी केले. उपस्थितांचे आभार कलापथक टीम भंडाराचे मार्गदर्शक विलास केजरकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुस्कान सैय्यद, मोरेश्वर समरीत, शरद धोतरे, आस्तिक उके, अनुष्का चव्हाण, तेजस्विनी डोंगरे, ईश्वया डीब्बे, श्रावणी पवार, केतन काटेखाये, मयुर प्रधान, गणेश निंबार्ते, तन्मय तितीरमारे, पीयूष गवरे तसेच कलापथक टीम भंडाराचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सार्वजनिक वाचनालयातील कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# मुदखेड तालुक्यातील SC समाज बांधवांनी मोठ्या संख्येने महामोर्चात सहभागी व्हावे – डॉ. हर्षवर्धन दवणे



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी: प्रकाश गवारे :** अनुसुचित जातींच्या उपवर्गीकरण विरोधात नांदेड येथील महामोर्चा संदर्भात भन्ते गगन बोधी यांच्या अध्यक्षतेखाली बौध्द प्रशिक्षण केंद्र मुदखेड येथे दि.१९ जुलै रोजी बौध्द बांधवांच्या वतीने बैठक घेण्यात आली. या बैठकीला कृती समितीचे डॉ हर्षवर्धन दवणे, स्वप्नील नरबाग, नगरसेवक कुलदीप राक्षसमारे, अतिश ढगे, यांनी उपस्थित राहुन सर्व SC बांधवांना दि.९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी नांदेड जिल्हा कृती समितीच्या वतीने येत्या ९ ऑगस्ट रोजी नांदेड शहरात महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात सामील होण्यासाठी कृती समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातींना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

"सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उपवर्गीकरणाच्या निर्णयामुळे अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले आरक्षण हे एकसंध आहे. ते तोडू देणार नाही."

कृती समितीचे डॉ. हर्षवर्धन दवणे म्हणाले, "महार, मांग, चांभार, मातंग, भंगी, धोर, होळार अशा अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती एक आहेत. आमच्या एकतेला तडा जाऊ देणार नाही. नांदेडचा हा महामोर्चा ऐतिहासिक होईल.त्यासाठी मुदखेड तालुक्यातील खुजडा, टाकळी, वासरी, माळकौठा, मेंडका सह इतर गावातील सर्व SC समाज बांधवांनी दि.९ ऑगस्ट रोजी महात्मा ज्योतीराव फुले पुतळा आय, टी,आय, नांदेड येथे मोठ्या संख्येने या महामोर्चात सहभागी व्हावे. कोणत्याही पक्ष-संघटनेचा झेंडा न घेता फक्त निळा ध्वज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो घेऊन यावे.यावेळी तालुक्यातील व शहरातील सर्व एस सी समाज बांधवांची उपस्थिती होती.

# घरकुल, विहीर, फळबाग अनुदान रखडले; रिसोड पंचायत समितीला 'टाळे ठोको' आंदोलनाचा निर्वाणीचा इशारा!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या फळबाग लागवड, वैयक्तिक सिंचन विहीर, गाय-गोठा व इतर विविध योजनांमधील शेकडो लाभार्थ्यांचे दुसरे व तिसरे हप्ते तसेच अनुदानाची रक्कम अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने लाभार्थ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. या सर्व प्रलंबित अनुदानाची तात्काळ वितरण करण्यात यावे तसेच लाभार्थ्यांकडून आर्थिक देवाणघेवाणीच्या तक्रारींची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा पंचायत समिती, रिसोड कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी दिला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर दुसरा ₹७० हजारांचा हप्ता मिळालेला नाही. तसेच दुसरा हप्ता प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांना तिसरा ₹३० हजारांचा हप्ता अद्यापही देण्यात आलेला नाही. अनेक गरीब लाभार्थ्यांनी सावकारी कर्ज, उसनवारी अथवा व्याजाने पैसे उचलून घरांचे बांधकाम सुरू केले आहे. मात्र शासनाकडून वेळेवर हप्ते न मिळाल्याने त्यांची घरे आजही अर्धवट अवस्थेत असून आर्थिक विवंचनेमुळे अनेक कुटुंबे मोठ्या अडचणीत सापडली आहेत.

याचबरोबर मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड, वैयक्तिक सिंचन विहीर, गाय-गोठा तसेच इतर विविध योजनांमधील अनुदानाची रक्कमही मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहे. लाभार्थी वारंवार पंचायत समिती कार्यालयाचे फेरे मारत असतानाही त्यांना समाधानकारक उत्तरे मिळत नसून प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे सांगून केवळ टाळाटाळ केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांकडून पंचायत समितीच्या नरेगा विभाग व बांधकाम विभागातील काही तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आर्थिक देवाणघेवाणीची मागणी होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. जो लाभार्थी आर्थिक देवाणघेवाण करण्यास नकार देतो, त्याचे घरकुल, विहीर, फळबाग व इतर योजनांचे हप्ते अथवा अनुदानाची रक्कम मुद्दाम प्रलंबित ठेवली जात असल्याचा गंभीर




आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे. शासनाच्या लोकाभिमुख व पारदर्शक प्रशासनाला काळिमा फासणाऱ्या या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर निलंबनासह फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेने प्रशासनाकडे सर्व पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते व अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी केली असून प्रत्येक प्रलंबित प्रकरण कोणत्या कारणामुळे रखडले आहे, याची लेखी माहिती देण्यात यावी, अशी मागणीही केली आहे. तसेच सर्व लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या आर्थिक देवाणघेवाणीशिवाय शासनाच्या योजनांचा लाभ मिळेल, याची लेखी हमी प्रशासनाने द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

बालाजी पाटील मोरे यांनी सांगितले की, हे निवेदन केवळ एका व्यक्तीचे नसून रिसोड तालुक्यातील शेकडो गरीब व गरजू लाभार्थ्यांच्या न्यायहक्काचा प्रश्न आहे. शासनाने मंजूर केलेल्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांना वेळेत मिळणे ही प्रशासनाची घटनात्मक व नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे प्रशासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी.

प्रशासनाने तात्काळ निर्णय घेऊन सर्व प्रलंबित अनुदान वितरित न केल्यास रिसोड तालुक्यातील सर्व घरकुल, फळबाग, विहीर, गाय-गोठा व इतर योजनांतील लाभार्थ्यांना सोबत घेऊन पंचायत समिती, रिसोड कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. प्रसंगी बेमुदत धरणे आंदोलन, ठिय्या आंदोलन तसेच पंचायत समिती कार्यालयाला 'टाळे ठोको' आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे, राम पाटील बोरकर, गजूअण्णा पैठणकर, राहुल मोरे, वसंतराव टाले, धनंजय बाजड, भगवान बाजार, रतन घोडे, समाधान गाडे, विठ्ठल खरात, भगवान घुले, मयूर जाधव यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोदा येथे सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला समर्थन; विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** देशातील वैज्ञानिक व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला नैतिक समर्थन देत पाटोदा तालुक्यातील विविध चळवळीतील कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांनी सोमवार (दि.२० जुलै-२०२६) रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शांततामय निदर्शने केली. या वेळी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने लक्ष द्यावे. सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाची दखल घेऊन त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी,



परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. आंदोलनकर्त्यांवर कोणत्याही प्रकारची दडपशाही करू नये, असे ही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या शिवाय, राम मंदिर देणगी प्रकरणातील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ही करण्यात आली. या वेळी कॉम्रेड महादेव नागरगोजे, भाई विष्णूपंत घोलप, शिवभुषण जाधव, पदमाकर बिनवडे, राहुल जाधव, मुकुंद शिंदे, गणेश कवडे, दिलिप गाडे, सय्यद शफावोद्दीन, शेख इम्रान नुर, शेख इलियास, आबासाहेब भोसले, अँड.विशाल मस्के, सुनिल काळे, पवन अडागळे, राजाभाऊ भोसले, नाईकवाडे मामा, शंकर घाडगे, पठाण युसुफ, सय्यद गणी, सह पाटोदा तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विविध चळवळीतील कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तळा ज्युनियर कॉलेज इ ११ वीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वीच्या नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी तळा तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार श्री. पाटील, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख, उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री. महेंद्रशेठ कजबजे, खजिनदार श्री. चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री. श्रीराम कजबजे, प्राथमिक विद्यामंदिरचे चेअरमन श्री. महादेव बैकर, सदस्य श्री. राजू सप्रे, वाशी हवेलीचे माजी सरपंच श्री. जगन्नाथ तांडेल, तलाठी अंकिता जाडे, शाळा समितीच्या सदस्या तावडे मॅडम, पर्यवेक्षिका सौ. जयश्री मचे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सृष्टी दलाल, हुमेरा चिपळूणकर,



संघमित्रा माळी, आफ्रिन गोठेकर आणि बिस्मा फटकारे या विद्यार्थिनींनी आपली भूमिका स्पष्ट केली. उच्च दर्जाचे शिक्षण, कडक शिस्त आणि आपल्याच हक्काच्या ग्रामीण भागात मिळणाऱ्या उत्तम सोयी-सुविधा यामुळेच आम्ही या महाविद्यालयाची निवड केली आहे. इथले संस्कार आणि वातावरण आम्हाला भविष्यात नक्कीच एक आदर्श नागरिक बनवेल, हा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

यावेळी मान्यवरांनी आपले विचार मांडले. केवळ पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय. विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाची गरज ओळखून तंत्रज्ञानाचा योग्य वापर करावा आणि आपल्या गुणवत्तेच्या जोरावर तळा शहराचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करावे. संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. या विचारांसह मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे निवेदन प्रा सर्जे व्ही. बी. तर आभार श्री. श्रीराम कजबजे यांनी मानले.

## वनोजा गावातून पंढरपूरच्या जयघोषासाठी लालपरी बस रवाना

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी- जितेंद्र खोडे** : दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा राळेगाव बस आगारातून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी तालुक्यातील राळेगाव आगारातून दि.२० जुलै रोजी दुपारी १ वाजता वनोजा येथून ४० विठ्ठलभक्त घेत पंढरपूर करिता राळेगाव आगाराची लालपरी रवाना झाली वनोजा ते पंढरपूर पूर्ण तिकीट ११५७रू. असून महीलासाठी ५७९ रु.अर्ध तिकीट ठेवण्यात आले आहे, वनोजा येथून पंढरपुर ५७० किलोमीटर अंतरावर आहे. वास्तविक पाहता खरिपाची पेरणी आटोपल्यानंतर शहरासह ग्रामीण भागातील अनेक भाविक आषाढी एकादशीनिमित्त विठू माऊलीच्या दर्शनासाठी जात असतात.पेरणी करून पावसाची तमा न बाळगता ग्रामीण भागातील नागरिकांनी विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पंढरीला जाण्याची तयार



केली आहे. राळेगाव तालुक्यातील वारकऱ्यांनी देखील भरभरुन प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात भर पडणार आहे. यावेळी वनोजा गावातील विठ्ठलभक्त भास्कर काचोळे, शालिक दांडेकर, देवराव गुडधे,रमेश चिंचोणे,दादाजी काटेकर,नारायण वाघमारे,सुधाकर उगेमुगे यांच्यासह अनेक भाविक भक्तांसह उत्साहाच्या वातावरणात लालपरी बस पंढरपूरसाठी रवाना झाली.

## पेपरफुटीविरोधात शिवसेना (ठाकरे) आक्रमक; "धर्मेंद्र प्रधान नव्हे, सरकारच बदलायचे"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- मयुर धुरी (दादर, मुंबई)** : नीटसह विविध भरती आणि प्रवेश परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांविरोधात शिवसेना (ठाकरे) पक्षाने शिवाजी पार्क परिसरात आंदोलन करत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आयोजित या आंदोलनात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर कडाडून टीका केली.

यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, "नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही आता क्षुल्लक गोष्ट आहे. हे सरकार पेपरफुटी थांबवू शकत नाही, तरुणांना रोजगार देऊ शकत नाही आणि जनतेला उत्तरही देऊ शकत नाही. त्यामुळे आता धर्मेंद्र प्रधान नव्हे, सरकारच बदलण्याची वेळ आली आहे."

आंदोलनाला शिवसेना (ठाकरे) नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी नेतृत्व केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने युवक-युवती सहभागी झाले होते.

उद्धव ठाकरे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच उपस्थितांना "देशभक्त बांधवांनो" अशी साद घालत, "मी या आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी नाही, तर प्रत्येकाने नेता बनावे, यासाठी आलो आहे," असे सांगितले. तरुणांमध्ये निर्माण झालेला असंतोष सरकार बदलल्याशिवाय शांत होणार नाही, असेही त्यांनी म्हटले.




दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनाला आपण पाठिंबा देणार असल्याचे सांगताना, राज्यभर गल्लोगल्ली आणि गावागावांत मानवी साखळी, मशाल मोर्चे आणि मेणबत्ती मोर्चे काढून संविधान आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर आणखी टीका करत, "हे सरकार पाकिस्तानशी चर्चा करण्यास तयार आहे; मात्र सोनम वांगचूक यांच्याशी चर्चा करण्यास तयार नाही. हेच का संघाच्या कल्पनेतील हिंदुराष्ट्र?" असा सवाल उपस्थित केला.

पेपरफुटी, बेरोजगारी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून केंद्र सरकारविरोधातील संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार या आंदोलनातून व्यक्त करण्यात आला.

## मोरेगाव येथे कृषी मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मोरेगाव विशेष प्रतिनिधी, तुकाराम नाटकर :** कृषी शिक्षणाचा प्रसार, आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती व शेतकऱ्यांना विविध कृषी प्रात्यक्षिकांचा लाभ मिळावा या उद्देशाने मोरेगाव येथे कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास शेतकरी, विद्यार्थी, महिला व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिलीप नाना मगर हे होते. प्रमुख पाहुणे शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष प्रकाश नाटकर ग्रामपंचायत



सदस्य योगेश काकडे, प्रभाकर चट्टे, शिवाजी राजे,दत्ताराव नाटकर, दत्ताराव मगर,म्हणून तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

मेळाव्यात विद्यार्थ्यांनी झिरो एनर्जी कूल चेंबर, ऑयस्टर मशरूम उत्पादन, रेशीम शेती, रायझोबियमद्वारे सेंद्रिय बीजप्रक्रिया, एनएसकेई (NSKE), जीवामृत, बीज उगवण चाचणी आदी विषयांवर सुमारे एक महिन्याच्या प्रात्यक्षिकांद्वारे तयार केलेली माहिती शेतकऱ्यांसमोर सादर केली. उपस्थित शेतकऱ्यांनी प्रात्यक्षिकांची पाहणी करून विविध कृषी तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन घेतले.प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत आधुनिक व शाश्वत शेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.या कृषी मेळाव्यामुळे शेतकरी व विद्यार्थ्यांना आधुनिक शेतीविषयक ज्ञान मिळण्यास मोठी मदत झाली.या कार्यक्रमात वनस्पतीशास्त्रतज्ञ आणि प्रमुख वक्ते म्हणून प्रा करंजे एम. एन सर यांनी शाश्वत शेती आणि बदलते हवामान यांविषया वर मनोगत व्यक्त केले . प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्राचार्य डॉ ए .ए चव्हाण , डॉ . एन एन चव्हान आणि डॉ ए.एस भोसले यांचे मुख्य मार्गदर्शन लाभले . या कार्यक्रमात उपस्थित कृषीकन्या आर.व्ही मदने यांनी सूत्रसंचालन केले आणि कार्यक्रमाचे इतर नियोजन करीके ए .व्ही , कदम ए .ए , कानकांती एस. एस यांनी केले .

## पाच लाख 28 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : एपीके फाईल डाऊनलोड करण्यास भाग पाडून पाच लाख 28 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गजेंद्र सिंग आणि इतर बँक खातेधारक यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 19 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला सुभाष तारे हे खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांना आरोपीने महानगर गॅसच्या कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवले आणि गॅस कनेक्शन बंद होईल असे सांगून एपीके फाईल डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यामध्ये माहिती भरण्यास सांगून पाच लाख 28 हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यामध्ये वळती करून घेतले आणि तारे यांची फसवणूक केली. फसवणूक झाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# चलो संसद' मोर्चावर मोठी पोलिस कारवाई; सीजेपीचा आंदोलन दडपण्याचा प्रयत्न, जंतरमंतर ते संसद परिसरात तणाव

## अभिजीत दिपके ताब्यात; लाठीमार, अश्रुधुराचा वापर, दिल्लीत तणावपूर्ण वातावरण

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली: प्रतिनिधी** : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी दिल्लीत मोठा तणाव निर्माण झाला. नीट-यूजी २०२६ पेपरफुटी, विविध स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहार, परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) ने दिलेल्या 'चलो संसद' हाकेच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी जंतरमंतर आणि संसद परिसरात अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था उभारली. मोर्चा रोखण्यासाठी करण्यात आलेल्या पोलिस कारवाईदरम्यान सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यासह अनेक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले. काही ठिकाणी लाठीमार, अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर आणि धक्काबुक्की झाल्याचे पाहायला पाहायला मिळाले.

पहाटेपासूनच जंतरमंतर परिसराला अक्षरशः पोलिस छावणीचे स्वरूप देण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावर बॅरिकेडिंग, वॉटर कॅनन, वज्र वाहने, शीघ्र कृती दल (आरएएफ), निमलष्करी दल आणि दिल्ली पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. आंदोलकांना जंतरमंतर सोडून बाहेर पडू नये यासाठी सर्व प्रवेश आणि निर्गमन मार्ग बंद करण्यात आले. दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना संसदेऐवजी जंतरमंतरपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील केरळ भवनापर्यंतच मोर्चा काढण्याची परवानगी दिली होती. मात्र, आंदोलकांनी संसदेकडे कूच करण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिस आणि आंदोलकांमध्ये वाद निर्माण झाला. त्यानंतर शीघ्र कृती दलाच्या जवानांनी लाठीमार केल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

मोर्चा सुरू होण्यापूर्वीच पोलिसांनी कारवाई करत सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आंदोलनस्थळी मोठा गोंधळ उडाला. काही ठिकाणी पोलिस आणि आंदोलकांमध्ये धक्काबुक्की झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्यांचाही वापर केला. सीजेपीने आरोप केला की, गेल्या ३१ दिवसांपासून हजारो विद्यार्थी शांततापूर्ण आंदोलन करत असताना सरकारने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. उलट संसदेकडे मोर्चा निघताच विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्यासाठी पोलिस यंत्रणेचा वापर करण्यात आला.

जंतरमंतरवर कडेकोट बंदोबस्त ठेवला असतानाच मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि कार्यकर्ते संसद परिसरात पोहोचल्याचा दावा करण्यात आला. ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांनी सुमारे ७५ हजार आंदोलक संसद परिसरात जमा झाल्याचा दावा केला आहे. या आकड्याला अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी संसद परिसरातील सुरक्षा व्यवस्था तातडीने अधिक कडक करण्यात आली. आंदोलक संसद भवनापासून सुमारे १५० मीटर अंतरापर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर सीआयएसएफच्या जवानांनी संसदेच्या प्रवेशद्वारांवर अतिरिक्त सुरक्षा तैनात केली आणि परिसरात बॅरिकेडिंग वाढवण्यात आले.

संसदेकडे जाणाऱ्या मार्गावरील बॅरिकेड्स हटवण्याचा प्रयत्न आंदोलकांनी केल्याचे सांगितले जाते. काही आंदोलक बॅरिकेड्सवर चढून घोषणाबाजी करत होते. त्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केला. या झटापटीदरम्यान काही आंदोलकांनी दगडफेक केल्याने एका पोलीस कर्मचाऱ्याला दुखापत झाल्याचे वृत्त आहे. तणावपूर्ण परिस्थितीमुळे परिसरातील इंटरनेट सेवा काही काळ विस्कळीत झाल्याचे तसेच मोबाईल जॅमर्सची संख्याही वाढवण्यात आल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, आंदोलन अधिक चिघळू नये म्हणून सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी चर्चेसाठी बोलावण्यात आले. जवळपास दोन तास प्रतीक्षा केल्यानंतर त्यांची सुमारे दहा मिनिटे चर्चा झाली. बैठकीनंतर सौरभ दास यांनी संघटनेच्या सर्व मागण्यांचे लेखी निवेदन नड्डा यांच्याकडे दिल्याचे सांगितले. पुढील चर्चेचे आश्वासन मिळाल्याचे त्यांनी म्हटले, मात्र चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले जात असल्याचा दावा त्यांनी केला.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याचे वृत्त आहे. या बैठकीत आंदोलनाची परिस्थिती आणि सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आल्याची माहिती समोर आली असली, तरी बैठकीच्या तपशीलाबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

नीट-यूजी २०२६ पेपरफुटी, विविध स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहार आणि परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकतेच्या मागणीसाठी सीजेपीने महिनाभरापूर्वी जंतरमंतरवर आंदोलन सुरू केले होते. देशभरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि विविध सामाजिक संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिल्याचा संघटनेचा दावा आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह सर्व परीक्षा गैरव्यवहारांची स्वतंत्र चौकशी, परीक्षा व्यवस्थेत पारदर्शक सुधारणा, दोषींवर कठोर कारवाई आणि स्वतंत्र परीक्षा नियामक यंत्रणा स्थापन करण्याच्या मागण्यांवर सीजेपी ठाम आहे. अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतल्यानंतरही आंदोलन मागे घेणार नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले असून, विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत लढा सुरूच राहील, असा निर्धार व्यक्त केला आहे. दुसरीकडे, दिल्ली पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती कारवाई केल्याचे म्हटले आहे.

# शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे; पावसाअभावी दुबार पेरणीचे संकट

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : तालुक्यासह परिसरात सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली. मात्र त्यानंतर पावसाने अचानक दडी मारल्याने पिके करपू लागली असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे मोठे संकट ओढवले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे आता आभाळाकडे लागले आहेत.

सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आदी पिकांची उगवण झाली असली तरी जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने अनेक ठिकाणी रोपे सुकण्यास सुरुवात झाली आहे. पावसाने आणखी काही दिवस उशीर केल्यास दुबार पेरणीशिवाय पर्याय उरणार नसल्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

यंदा आधीच बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा परिस्थितीत पुन्हा पेरणी करावी लागल्यास आर्थिक संकट अधिक तीव्र होईल. अनेक शेतकरी कर्ज काढून शेती करत असल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे.



शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने परिस्थितीचे पंचनामे करून आवश्यक मदत जाहीर करावी, तसेच पीकविमा व कृषी योजनांचा लाभ लवकरात लवकर मिळावा, अशी मागणी केली आहे. दरम्यान, हवामान खात्याने लवकरच समाधानकारक पावसाचा अंदाज व्यक्त करावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

**ठळक मुद्दे**

पावसाअभावी खरीप पिके धोक्यात.

सोयाबीन, कापूस, तूरसह विविध पिकांची वाढ खुंटली.

दुबार पेरणीचे संकट गडद.

वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत.

तातडीच्या शासकीय मदतीची मागणी.

# फळबागांचे संरक्षण आता शास्त्रीय पद्धतीने! नागरतासमध्ये कृषी मित्रांकडून १०% बोर्डोपेस्ट तयार करण्याचे प्रात्यक्षिक; शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषी महाविद्यालय, आमखेडा येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत नागरतास येथे कृषी मित्र म्हणून कार्यरत विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना १० टक्के बोर्डोपेस्ट तयार करण्याचे शास्त्रोक्त मार्गदर्शन करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. या उपक्रमाला गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आधुनिक व शास्त्रीय शेती पद्धतींबाबत विशेष उत्सुकता दर्शविली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी कमी खर्चात आणि प्रभावी पद्धतीने फळबागांचे संरक्षण करावे, रोग व किडींचा प्रादुर्भाव वेळेत रोखावा आणि उत्पादनात वाढ व्हावी, या उद्देशाने कृषी मित्र विद्यार्थी अनिकेत भागवत चौधरी, कृष्णा चौधरी, शंतनू खराटे, सूरज काळे, विवेक गोटे आणि विठ्ठल गवळी यांनी बोर्डोपेस्ट तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून दिली.



यावेळी एका भांड्यात १०० ग्रॅम कॉपर सल्फेट ५०० मिली पाण्यात विरघळविण्यात आले, तर दुसऱ्या भांड्यात १०० ग्रॅम चुना ५०० मिली पाण्यात मिसळून त्याचे द्रावण तयार करण्यात आले. त्यानंतर दोन्ही द्रावणे योग्य प्रमाणात एकजीव करून १० टक्के बोर्डोपेस्ट तयार करण्यात आली. तयार मिश्रणाचा वापर कशा प्रकारे करावा, कोणत्या अवस्थेत फवारणी करावी आणि त्याचे परिणाम अधिक प्रभावी होण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबतही विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी फळबागांमध्ये बुरशीजन्य रोग, खोडावरील जखमा, विविध किडींचा प्रादुर्भाव तसेच पावसाळ्यात होणाऱ्या संसर्गापासून झाडांचे संरक्षण करण्यासाठी बोर्डोपेस्ट अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगण्यात आले. वेळेवर आणि योग्य प्रमाणात वापर केल्यास झाडांचे आयुष्य वाढते, रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो आणि उत्पादनाच्या गुणवत्तेतही लक्षणीय सुधारणा होत असल्याचे कृषी मित्रांनी स्पष्ट केले.शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. आधुनिक तंत्रज्ञान आणि शास्त्रीय शेतीची माहिती थेट गावपातळीवर मिळाल्याने शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत कृषी महाविद्यालयाचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. क्षीरसागर, उपप्राचार्य प्रा. पी. टी. निचळ, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस. टी. कव्हर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एम. गायकवाड तसेच प्रा. ए. डी. मानवतकर, प्रा. एस. बी. वाकुडकर, प्रा. ए. जे. भोयर, प्रा. सरदार, प्रा. एस. एस. शेख, प्रा. गणेश पारिस्कर आणि लोखंडे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमातून विद्यार्थी केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष शेतात उतरून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान उपलब्ध करून देत आहेत. अशा उपक्रमांमुळे शेती अधिक शाश्वत, उत्पादनक्षम आणि वैज्ञानिक बनण्यास निश्चितच मदत होणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# जामखेड– कर्जत रोडवरील भिषण आपघात,दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार** : जामखेड - कर्जत रोडवरील पाटोदा ( गरडाचे) गावाजवळील वळणावर चारचाकी वाहन व आयशर टॅम्पो या दोन वाहनाची समोरासमोर जोराची धडक होऊन झालेल्या भिषण अपघातात श्रीगोंदा तालुक्यात शासकीय सेवेत असलेल्या दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. आपघात एवढा भिषण होता की दोन्ही वाहनांचा चक्काचूर झाला आहे. या आपघात प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला टॉम्पोचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संबंधित रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.



निखिल मोतीलाल बहुरे, रा.प्लॉट नंबर ६५ राजे संभाजी कॉलनी, जळगाव रोड, जाधववाडी हर्सूल ता.जि.छत्रपती संभाजीनगर, हल्ली रा. श्रीगोंदा, जिल्हा. अहिल्यानगर व रामचंद्र महाजन बहुरे, रा. बेंबळयाचीवाडी. पोष्ट. खोडेगाव. ता. जि. छत्रपती संभाजीनगर, हल्ली रा. श्रीगोंदा आशी अपघात मयत झालेल्या दोन शासकीय कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

या बाबत अधिक माहिती अशी की आज रविवार दि १९ जुलै २०२६ रोजी रात्री अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास वरील दोन शासकीय कर्मचारी निखिल मोतीलाल बहुरे व रामचंद्र महाजन बहुरे हे दोघे चुलतभाऊ त्यांच्या मुळगाव संभाजीनगर या ठिकाणाहून श्रीगोंदा येथिल नोकरीच्या ठिकाणी एम.एच -२० जी. ई-३५६२ या क्रमांकाच्या चारचाकी वहानाने चालले होते. तर श्रीगोंदा रोडवरून आयशर टॅम्पो क्रमांक एम. एच १४ – बी. जे २२९३ या वाहनातून जामखेड कडे येत होते. याच वेळी रविवार दि १९ रोजी रात्री अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास दोन्ही वाहने जामखेड श्रीगोंदा रोडवरील जामखेड तालुक्यातील पाटोदा गरडाचे गावाजवळील वळणावर आली होती. यावेळी परिसरात रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याने दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामुळे एका बाजूचा रस्ता बंद करून केवळ एका लेनवरून वाहतूक सुरू होती. दरम्यान याच वेळी दोन्ही वाहने समोरासमोर एकच लेनवर आली आणि यामध्ये याच ठिकाणी भरधाव वेगातील दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक होऊन हा अपघात घडला व या आपघातात चारचाकी वाहनातील शासकीय कर्मचारी निखिल मोतीलाल बहुरे व रामचंद्र महाजन बहुरे या दोन चुलतभावांचा जागीच मृत्यू झाला. आपघात घडल्या नंतर टॅम्पो चालक घटनास्थळाहुन फरार झाला आहे.

आपघातात मयत झालेले निखिल मोतीलाल बहुरे, हे मुळचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहेत ते सध्या श्रीगोंदा तहसील कार्यालय येथे महसूल सहायक म्हणून नोकरीस आहेत. तर दुसरे मयत रामचंद्र महाजन बहुरे, हे देखील छत्रपती संभाजीनगर येथील बेंबळयाचीवाडी येथिल रहीवाशी आसुन ते सध्या श्रीगोंदा येथिल पाटबंधारे विभाग येथे मोजणीदार म्हणून नोकरीस आहेत. दोघेही चुलतभाऊ असल्याचे समजते ते आपल्या श्रीगोंदा येथिल नोकरीच्या ठिकाणी जात असताना जामखेड जवळ सदरचा आपघात घडला आहे.

आपघाताची माहिती समजताच जामखेड चे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघ, पो. कॉ. सचिन चव्हाण, वहान चालक यांनी घटनास्थळी जाऊन जखमींना गाडीचा पत्र तोडुन बाहेर काढले व जामखेड ग्रामिण रुग्णालयात दाखल केले असता ते पुर्वीच मयत झाले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

टॅम्पो चालकाचे नाव समजु शकले नसुन तो आपघात घडल्यानंतर घटनास्थळाहुन रात्रीच फरार झाला आहे. पोलीसांनी त्याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघ हे करित आहेत..

# सपकळवाडी सोसायटीच्या चेअरमनपदी सौ. रुक्मिणी चव्हाण यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील राजकीय व सहकार क्षेत्रात महत्त्वाचे स्थान असलेल्या सपकळवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सौ.रुक्मिणी रामचंद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या कार्यात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची भावना सभासद,शेतकरी आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली. सोसायटीच्या निवडीनंतर नवनिर्वाचित चेअरमन तसेच व्हाईस चेअरमन यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



यावेळी श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक बापूराव सपकळ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक बी.के.सपकळ,अजित सपकळ,ज्ञानदेव (ज्ञानेश्वर) माऊली सपकळ, पांडुरंग सपकळ,राजेंद्र सपकळ,विष्णू भुजबळ, पोपटराव पवार (मिस्त्री),शत्रुघ्न घाडगे,राहुल सपकळ,हेमंत सपकळ,बापूराव जाधव,डी.पी. चव्हाण,कुंभार भाऊ,माने सर,रणजित चव्हाण, अजित चव्हाण,ओंकार कदम,अमित कदम, आशीर्वाद ग्राम संघाच्या अध्यक्षा अंजली कदम, साक्षी कदम,वैशाली कदम यांच्यासह सपकळवाडी व हिंगणेवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत विकासाभिमुख निर्णय घेण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील शेती, कर्जपुरवठा, विविध विकास योजना आणि सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सोसायटीने प्रभावी भूमिका बजावावी, अशा अपेक्षाही व्यक्त करण्यात आल्या.

सपकळवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी ही परिसरातील प्रभावी सहकारी संस्था असून स्थानिक राजकारणातही तिचे महत्त्वाचे स्थान आहे.

त्यामुळे चेअरमनपदी सौ. रुक्मिणी रामचंद्र चव्हाण यांची बिनविरोध झालेली निवड विशेष लक्षवेधी ठरली आहे.

विशेष म्हणजे, आगामी सपकळवाडी–हिंगणेवाडी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेली ही निवड राजकीयदृष्ट्याही महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

या निवडीमुळे स्थानिक राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, गावातील आगामी राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होण्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

नवनिर्वाचित चेअरमन सौ. रुक्मिणी चव्हाण यांनी सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत, शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी पारदर्शक व विकासाभिमुख कारभार करण्यास प्राधान्य देणार असून सोसायटीला अधिक सक्षम आणि प्रगत करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने कार्य करू,अशी ग्वाही दिली.

# पालखी सोहळा संपताच सणसर मधील पालखी महामार्गाचे काम ठप्प : अधिकारी व ठेकेदार गायब?

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या सणसर परिसरातील कामाला मागील आठवड्यात चांगला वेग आल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक दिवसांपासून रखडलेल्या या कामाला अखेर गती मिळाल्याचे चित्र दिसत असल्याने महामार्गाचे काम लवकर पूर्ण होईल,अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली होती. मात्र,संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा सणसर येथील मुक्काम पार पडल्यानंतर चार दिवस उलटूनही कामाच्या ठिकाणी ना अधिकारी दिसत आहेत, ना ठेकेदार आणि ना कामगार. त्यामुळे पुन्हा एकदा हे काम ठप्प झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून,"पालखी सोहळा येईपर्यंतच काम सुरू होते का?"असा सवाल उपस्थित केला जात आहे.पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर केवळ दिखाऊपणे काम सुरू करून नंतर ते बंद करण्यात आले का,अशी चर्चा सणसर परिसरात सुरू आहे. ग्रामस्थांच्या मते,सणसर गावातून जाणाऱ्या या महामार्गावरील अपूर्ण कामामुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.अनेक ठिकाणी रस्ता अपूर्ण असून धूळ, खड्डे आणि वाहतुकीतील अडथळ्यांमुळे अपघाताचा धोका कायम आहे. काम लवकर पूर्ण झाल्यास नागरिकांच्या अनेक समस्या दूर होतील; मात्र अशाच पद्धतीने काम रखडत राहिल्यास भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीतीही व्यक्त होत आहे.

"सणसर गावावरच वारंवार दुर्लक्ष का केले जात आहे?" असा प्रश्नही ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. पालखी महामार्ग हा भाविकांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने या कामाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, पालखी महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत इंदापूर तालुक्यातील लोकप्रतिनिधींना लवकरच ग्रामस्थ भेटून निवेदन देणार असल्याची माहिती समोर येत आहे. संबंधित विभागाने तातडीने काम पुन्हा सुरू करून निश्चित मुदतीत पूर्ण करावे, अशी सणसर परिसरातील नागरिकांची जोरदार मागणी आहे.

# रेवदंडा पोलिसांची धडाकेबाज कामगिरी! अवघ्या 36 तासांत दुचाकी चोर गजाआड; चोरीची एनटॉर्कही हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खानाव (ता. अलिबाग) येथे चोरीस गेलेली मोटरसायकल अवघ्या 36 तासांत शोधून काढत आरोपीला जेरबंद करण्याची उल्लेखनीय कामगिरी रेवदंडा पोलिसांनी केली आहे. स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या चोरीच्या घटनेचा जलदगतीने छडा लावत पोलिसांनी आपल्या तपास कौशल्याची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खानाव येथील जितेश भास्कर पाटील (वय 33) यांनी आपली टीव्हीएस एनटॉर्क 125 सीसी (क्रमांक MH-06-CS-8745) ही मोटरसायकल 16 जुलै रोजी रात्री घराच्या अंगणात उभी केली होती. मात्र 17 जुलै रोजी पहाटे 1.28 वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने संधी साधून ही मोटरसायकल लंपास केली. सकाळी वाहन जागेवर नसल्याचे लक्षात येताच जितेश पाटील यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात धाव घेत




तक्रार दाखल केली.

या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक 101/2026, भारतीय न्याय संहिता कलम 303(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गडदे यांनी तत्काळ तपासाला गती दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अंगज यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली.तपास पथकाने घटनास्थळ परिसरातील तसेच विविध मार्गांवरील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्यामध्ये आरोपी चोरीची मोटरसायकल घेऊन पेण–पनवेल मार्गे जात असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलीस नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून पेण–पनवेल परिसरातील वाहतूक शाखांना तातडीचा बिनतारी संदेश पाठविण्यात आला. महामार्ग वाहतूक पोलीस केंद्र पळस्पे यांच्या सहकार्याने नाकाबंदी करण्यात आली.

या संयुक्त कारवाईदरम्यान पोलीस कर्मचारी मनीष ठाकूर, तुषार पारवे, केदारनाथ साखरकर आणि समीर धुरी यांनी अतिशय शिताफीने सापळा रचत आरोपी शंकर मंगल गिलवा (वय 33, रा. चम्पागड, ता. राऊरकेला, जि. सुंदरगड, ओडिशा) याला चोरीच्या मोटरसायकलसह ताब्यात घेतले. विशेष म्हणजे, गुन्हा घडल्यानंतर अवघ्या 36 तासांच्या आत आरोपीला पकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी रेवदंडा पोलिसांच्या सतर्कता, तांत्रिक तपास आणि जलद प्रतिसादाचे कौतुक केले आहे. अल्पावधीत गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला बेड्या ठोकल्याने चोरट्यांमध्येही धाक निर्माण झाला असून कायद्याचा धाक अजूनही कायम असल्याचा संदेश या कारवाईतून गेला आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मनीष ठाकूर करीत आहेत.

# ७ महिन्यांपासून सरपंचाविरोधातील तक्रार धूळखात

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर तालुक्यातील शिवार बु. ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. मंगलाताई माणिकराव देशमुख यांच्याविरोधात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ३९(१) अंतर्गत कारवाई करण्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांचा अहवाल सादर होऊन तब्बल सात महिने उलटले, तसेच तक्रार दाखल करून तीन महिने लोटूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत प्रशासकीय समिती सदस्य पंकज सुभाषराव कदम यांनी केला आहे. यामुळे जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

**गटविकास अधिकाऱ्यांचा अहवालही दुर्लक्षित**

गटविकास अधिकारी, पंचायत समिती दर्यापूर यांनी दि. १९ जानेवारी २०२६ रोजी पत्र क्र. १५७ द्वारे सर्व पुराव्यांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्याकडे अहवाल सादर केला होता. या अहवालात सरपंचांनी पदाचा



गैरवापर व कर्तव्यात कसूर केल्याचा उल्लेख करण्यात आला होता.

**वारंवार तक्रारी, तरीही कारवाई शून्य**

तक्रारदार पंकज कदम यांनी दि. १६ मार्च २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे स्वतंत्र तक्रारी सादर केल्या. त्यानंतर दि. २७ एप्रिल २०२६ रोजी स्मरणपत्र देऊन तसेच दूरध्वनीद्वारे पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**'वरिष्ठांच्या पत्रालाही केराची टोपली'**

## मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांचा हेतू काय? – प्रशासकीय समिती सदस्य पंकज कदम यांचा संतप्त सवाल

दि. ८ जून २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात पंकज कदम यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

"अहवाल सादर होऊन सहा महिने आणि तक्रार देऊन तीन महिने झाले. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या पत्रांनाही केराची टोपली दाखविण्यात आली. तात्काळ माहिती देऊन आवश्यक कारवाई करावी."

**विभागीय आयुक्तांकडे दोन प्रमुख मागण्या**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई का केली नाही, याची सखोल चौकशी करण्यात यावी.

२) सरपंचांवर कलम ३९(१) नुसार अपात्रतेची कारवाई करून पदावरून हटवावे,

प्रशासकीय नियुक्ती रद्द करावी तसेच संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा.

## पोषण आहार प्रकरणी पारुनगर शाळेचे मुख्याध्यापक निलंबित

# 'आपले सरकार'वरील तक्रारीनंतर विभागीय चौकशी; शासनाच्या निर्देशानंतर कारवाई

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारुनगर येथील शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विभागीय चौकशीनंतर मुख्याध्यापक हेमंत डी. जोशी यांना निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही कारवाई केली असून, निलंबन आदेशाची तामील करण्यात आल्याची नोंद शिक्षण विभागाच्या पत्रव्यवहारात आहे.

या प्रकरणाची सुरुवात श्रीकांत टिळक यांनी 'आपले सरकार' पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारीतून झाली. तक्रारीत शालेय पोषण आहार योजनेतील तांदूळ वितरण, कथित आर्थिक अनियमितता, गणवेश खरेदी-वितरण तसेच इतर प्रशासकीय बाबींमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या तक्रारीची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने ९ मार्च २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश



दिले होते.त्यानुसार शिक्षण विभागामार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान संबंधित मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर उपलब्ध नोंदी, चौकशी अहवाल आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या शिफारशींचा विचार करून निलंबनाची कारवाई करण्यात आली.तक्रारीमध्ये विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात पोषण आहार तयार करणे, शासनाची पूर्वपरवानगी न घेता तांदूळ वाटप करणे, पोषण आहार योजनेतील कथित आर्थिक अनियमितता, तसेच गणवेश वितरण आणि इतर प्रशासकीय कामकाजात अनियमितता झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. याशिवाय काही कागदपत्रांसाठी विद्यार्थ्यांकडून पैसे वसूल करण्यात आल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पाठपुरावा ग्रामीण पत्रकार संघ, श्रीकांत टिळक आणि भीम क्रांती संघटनेने केला होता. शासनस्तरावरील पत्रव्यवहारानंतर संबंधित प्रशासकीय कारवाई करण्यात आली असून, विभागीय चौकशीची प्रक्रिया पुढे सुरू आहे.

# वीर वाजेकर महाविद्याल फुंडेच्या अथर्व गाताडीची; भारतीय नौसेनेत अग्निवीर म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, महालण विभाग, फुंडे, ता. उरण येथील "रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमी" मधील विद्यार्थी अथर्व रवींद्र गाताडी यांची भारतीय नौसेनेत अग्निवीर पदावर निवड झाली आहे.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. रामशेठ ठाकूर, रायगड विभाग व महाविद्यालय विकास



समिती चेअरमन मा. बाळाराम पाटील,रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी. जे. पाटील मा. भावनाताई घाणेकर मा. सुधीर घरत सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवक, माजी विद्यार्थी संघ तसेचप्राचार्य डॉ. अमोद ठक्कर संचालक डॉ. चिंतामण धिंदळे आणि ,डॉ. संदीप घोडके,उपप्राचार्य व सर्व विद्यार्थ्यांनी अथर्व गाताडी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी अथर्व गाताडी यांनीही या यशाबद्दल, रयत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रातील प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांचे आभार मानले आणि अधिकाधिक विद्यार्थ्यांनी संरक्षण दलात सामील होण्यासाठी असेच परिश्रम घ्यावेत, असे आवाहन केले आहे.


या यशाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून विद्यार्थी, प्राध्यापक व माजी विद्यार्थ्यांकडून त्यांचे कौतुक होत आहे.अथर्व गाताडी यांनी रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीत घेतलेल्या मार्गदर्शन व प्रशिक्षणाच्या जोरावर नौसेना भरती प्रक्रियेतील शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा आणि वैद्यकीय चाचणी यशस्वीरीत्या पार करून अग्निवीर म्हणून निवड मिळवली. देशसेवेची संधी मिळाल्याने त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे. रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व संरक्षण दल भरतीचे मोफत मार्गदर्शन दिले जाते. अथर्व गाताडी यांच्या यशामुळे परिसरातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. अमोद ठक्करयांनी या वेळी व्यक्त केले.

# सिंधुदुर्ग किल्ल्यावरील ढासळला; बुरुजाची भारतीय पुरातत्व विभाग कडून पाहणी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : सिंधुदुर्ग किल्ला हा महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीवरील मालवण बंदराजवळ असून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी परकीय सागरी आक्रमणांपासून संरक्षण करण्यासाठी आणि मराठा आरमाराला बळकटी देण्यासाठी या किल्ल्याची निर्मिती 48 एकरमध्ये सन1664 साली केली होती. किल्ल्याच्या किल्ल्याला शत्रूपासून सुरक्षित ठेवण्यासाठी52 बुरुज बांधण्यात आले आहेत.अद्वितीय तंत्रज्ञान: किल्ल्याचा पाया मजबूत करण्यासाठी त्याकाळी शेकडो खंडी शिसे (Lead) वापरण्यात आले होते, जेणेकरून समुद्राच्या लाटांच्या माऱ्याने तटबंदीला धक्का पोहोचणार नाही.याची काळजी घेण्यात आली होती परंतु आज 350 वर्षांहून अधिक काळ वादळी हवामान आणि समुद्राच्या प्रचंड लाटा यान सामोरे जात अखेर या किल्याच्यासिंधुदुर्ग किल्ल्याच्या पूर्वेकडील बुरुजाच्या तळभागातील तटबंदीचा काही भाग ढासळला, सदरचे वृत्त माध्यमांतून प्रसिद्ध झाल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्हाच्या जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग श्रीमती तृप्ती धोडमिसे यांनी त्याची तात्काळ दखल घेऊन महसूल प्रशासनामार्फत ASI यांना पत्र लिहून सदर ठिकाणी पाहणी व पुढील अनुषंगिक कार्यवाही करणेबाबत कळविले.

त्यानुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (Archaeological Survey of India), मुंबई मंडळाचे अधीक्षक पुरातत्त्वविद डॉ. अभिजित आंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड उपमंडल चे संरक्षण सहाय्यक संकेत कावलकर, मालवण तहसीलदार गणेश लव्हे, देवबाग ग्राम महसूल अधिकारी श्री वायाळ व त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांनी नुकतीच सिंधुदुर्ग किल्ल्यावरील



अलीकडेच ढासळलेल्या बुरुजाच्या भागाची प्रत्यक्ष पाहणी दिनांक 19जुलै 2026 च्या संध्याकाळी केली.

या पाहणीदरम्यान ढासळलेल्या बुरुजाची सद्यस्थिती, तटबंदीची संरचनात्मक स्थिरता, दगडी बांधकामाची अवस्था तसेच समुद्री लाटा, भरती-ओहोटी आणि पावसामुळे झालेल्या परिणामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आवश्यक तांत्रिक निरीक्षणे व मोजमाप करून संवर्धनासाठी उपयुक्त माहिती संकलित करण्यात आली.पाहणीनंतर संबंधित निरीक्षणांचा सविस्तर अहवाल भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मुंबई मंडळाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानुसार किल्ल्याच्या संवर्धन व आवश्यक दुरुस्तीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बुरुजाच्या अलीकडील पडझडीमुळे त्याच्या संवर्धनाची गरज अत्यावश्यक झाली असून, ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# विशेष सघन पुनरावलोकन (SIR) अभियानात पालघर जिल्ह्यातील तीन BLO अधिकाऱ्यांनी १००% उद्दिष्ट पूर्ण

**पालघर** : पालघर जिल्ह्यात विशेष सघन पुनरावलोकन (SIR) अभियानाने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जिल्ह्यातील तीन बूथ लेव्हल अधिकाऱ्यांनी (BLO) आपल्या मतदान केंद्रांवर प्रगणना फॉर्मचे (Enumeration Form) १०० टक्के वितरण व डिजिटायझेशन पूर्ण करून जिल्ह्यात प्रथम मान मिळवला आहे. महत्त्वपूर्ण निवडणूक प्रक्रियेतील हे कार्य त्यांनी कठोर परिश्रम आणि वेळेत पूर्ण केले असून, यामुळे मुक्त, निष्पक्ष, पारदर्शक आणि सर्वसमावेशक निवडणूक प्रक्रियेप्रती जिल्हा प्रशासनाची बांधिलकी अधोरेखित झाली आहे.

पहिला मानाचा टप्पा मोखाडा तालुक्यातील मतदान केंद्र क्रमांक ६१ (चास) येथील BLO श्री. गोपाळ काव्हा यांनी गाठला. त्यांनी त्यांच्या मतदान केंद्रावरील ५१५ मतदारांसाठी प्रगणना फॉर्मचे (Enumeration Form) १०० टक्के वितरण व डिजिटायझेशन दि. ८ जुलै २०२६ रोजी पूर्ण केले. या मोहिमेचे काम यशस्वीपणे पूर्ण करणारे ते पालघर जिल्ह्यातील पहिले BLO ठरले.

दुसरा मानाचा टप्पा विक्रमगड तालुक्यातील मतदान केंद्र क्रमांक ३०४ (नळशेत) येथील BLO श्री. नितीन निपाणीकर यांनी गाठला. त्यांनी त्यांच्या मतदान केंद्रावरील ४६८ मतदारांसाठी प्रगणना फॉर्मचे (Enumeration Form) १०० टक्के वितरण व डिजिटायझेशन दि. १० जुलै २०२६ रोजी पूर्ण केले. यासह ते जिल्ह्यात १०० टक्के पूर्णत्व प्राप्त करणारे दुसरे BLO ठरले.

तिसरा मानाचा टप्पा जव्हार तालुक्यातील मतदान केंद्र क्रमांक १४६ (गंगापूर) येथील BLO श्री. सतीश भानुदास भिडवे यांनी गाठला. त्यांनी त्यांच्या मतदान केंद्रावरील ५९६ मतदारांसाठी प्रगणना फॉर्मचे (Enumeration Form) १०० टक्के वितरण व डिजिटायझेशन दि. २० जुलै २०२६ रोजी पूर्ण केले. या मोहिमेचे काम यशस्वीपणे पूर्ण करणारे ते जव्हार तालुक्यातील पहिले तसेच पालघर जिल्ह्यातील तिसरे BLO ठरले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी या अधिकाऱ्यांचे उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, “विशेष सघन पुनरावलोकन (SIR) अभियानाचे यश आपल्या BLO यांच्या समर्पण आणि प्रामाणिक कार्यावर अवलंबून आहे.